
*Progressive Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)**
**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 11, ISSUE 4** **APRIL 2026**

# *MODLIB: E-Bulletin of Library & Information Centre*




**E-bulletin published by:**
**Prof. Dr. Nivedita G. Ekbote, Principal, MCASC (Autonomous), Shivajinagar, Pune-5.**
**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**
**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable, Clerk, Library.**
**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: April 2026

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

## *Table of Contents*


| Sr. No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **93rd Foundation Day Celebrations of Progressive Education Society** | 4 - 18 |
| 2 | **Article on 4th Year of UG Courses by Prof. Shamkant Deshmukh, Vice Principal & Head, Department of Computer Science** | 19 |
| 2 | **Events conducted by the Library during April 2026** | |
| | • *Mahatma Jyotiba Phule Jayanti* | 20 - 23 |
| | • *Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar Jayanti and Salag 14 taas Abhyas Abhiyan (सलग १४ तास अभ्यास अभियान)* | 24 - 40 |
| | • *Mahatma Basweshwar Jayanti* | 41 - 42 |
| | • *Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti* | 43 - 44 |
| 3 | **Events conducted by Departments in April 2026** | |
| | • *Guidance session for Industrial Training Project and Research Project organised by the Department of Computer Science* | 46 - 47 |
| 4 | **Newly added and Books received in Gratis in Library during April 2026** | 48 - 49 |
| 5 | **E-newspaper clippings: April 2026** | 51 - 71 |
| 6 | **Upcoming events: May 2026** | 72 |

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६



# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६









# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६













# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६













# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६















# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६
















# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६















# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६


















# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६













# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६

## *पुणे प्रवाह न्यूज**93 वर्षाची पी ई सोसायटीची दिमाखदार वाटचाल ......* *कार्याध्यक्ष मा प्रा डॉ गजानन र .एकबोटे*

April 19, 2026

*पुणे प्रवाह न्यूज*




*93 वर्षाची पी ई सोसायटीची दिमाखदार वाटचाल ......*



*कार्याध्यक्ष मा प्रा डॉ गजानन र .एकबोटे*



# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६

***पुणे***

" प्रोग्रेसिव्ह एज्यूकेशन सोसायटी " चा 93 वा वर्धापनदिन रविवारी उत्साहात पार पडला .

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी ची स्थापना दिवंगत गुरूवर्य श्री शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या 5 शिक्षक सहकाऱ्यांनी 1934 मध्ये "अक्षय तृतीया" या शुभ दिवशी केली . प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वाटचालीतील प्रमुख शब्द "प्रोग्रेसिव्ह" आणि "मॉडर्न".

'प्रोग्रेसिव्ह' म्हणजे काळ आणि नावीन्यपूर्णतेच्या भावनेला धरून राहणे, तर 'आधुनिक' म्हणजे शैक्षणिक, क्रीडा किंवा सांस्कृतिक उपक्रम असोत, अश्या सर्व बाबतीत अद्ययावत दृष्टिकोन. तसेच विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आधुनिक उपकरणे व आधुनिक पद्धतीचा वापर करण्याचा संकल्प त्या दिनी करण्यात आला

जो अजूनही पाळला जातो.

1934 साली लावलेल्या या रोपट्याचा आता 93 वर्षा नंतर एक मोठा वटवृक्ष तयार झालेलं आहे .

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वेगवेगळ्या शैक्षणिक स्तरावर काम करत असुन आज प्रोग्रेससिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत ६५ विद्यालये तसेच महाविद्यालये आहेत. एकुण ६५००० विद्यार्थ्यांना संस्था ज्ञानदानाचे काम करते.

विविध क्षेत्रांमध्ये प्रॉग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आपले नाव मोठं करत आहे . कला , क्रीडा , शिक्षण, संशोधन, राजकारण सर्वच क्षेत्रामध्ये प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे विद्यार्थी प्रगती करत असुन या सर्वच बाबतीत आज संस्था आघाडीवर आहे.

आज संस्थेची 12 महाविदयालये असून त्यातील संस्थेच्या 7 महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळालेला असून उरलेल्या महाविद्यालयाना लवकरच स्वायत्त दर्जा मिळेल असा मानस आहे. सर्व महाविद्यालये NAAC मानांकित असून तांत्रिक संस्था या NBI मानांकित आहेत.

ही संस्था नावाप्रमाणेच आधुनिक असून या संस्थेच्या सर्व शाळा, महाविद्यालये व संस्था मध्ये नवीन अभ्यासक्रम व सर्टिफिकेट कोर्सेस गोरगरीब व माध्यमावर्गीयना परवडतील अश्या फी मध्ये चालू केलेले असून त्यांना भरघोस यश मिळालेले आहे. संस्थेच्या मराठी माध्यमातील शाळांना विध्यार्थ्यांची कमतरता नाही. इंग्रजी माध्यमातील शाळांचे दहावीचे निकाल 100%

लागत आहेत.

"शिक्षकांनी सुरु केलेली ही संस्था अजूनही शिक्षक चालवतात. त्यामुळे शिक्षणाचे व्यापारीकरण झालेले नाही. विध्यार्थी व कर्मचारी यांचे हित संस्था सतत जपत आहे.संस्थेत पगार वेळेवर दिले जातात.

93 वर्षाची संस्था अतिशय दिमाखाने उभी असून येणाऱ्या कालावधी मध्ये मोशी येथे 22 कोटींचा प्रकल्प उभा करण्याची मनीषा आहे.

इंजिनीरिंग कॉलेजमध्ये ' अर्टिफिशीअल इंटी लिजिन्स' ची 10 कोटीची लॅब उभारून त्याचे उदघाट्न माननीय मुख्यमंत्री मा श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्याचा मानस आहे.

संस्थेला भगवंताचा आशीर्वाद आहे व समाजाचा भरघोस पाठिंबा आहे. संस्थेची भरभराट अशीच चालू राहावी ही भगवंत चरणी प्रार्थना आहे असे संस्थेचे कार्याध्यक्ष मा डॉ गजानन एकबोटे म्हणाले.

स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी चे सर्व संबंधीत तसेच सर्व विद्यालय महाविद्यायाचे प्राचार्य तसेच शिक्षक व संस्थेचे अध्यक्ष , कार्याध्यक्ष , कार्यवाह , सहकार्यवाह उपस्थित होते .

हा स्नेहमेळावा प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी चे कार्याध्यक्ष. मा. प्रा डॉ श्री. गजानन. र. एकबोटे
प्रा. श्री. शमाकांत देशमुख (कार्यवाह) प्रो. ए. सोसायटी,
प्रा. श्री. सुरेश तोडकर (सहकार्यवाह)
प्रा. डॉ सौ. ज्योत्स्ना एकबोटे (सहकार्यवाह)
मा चितरजन कांबळे (उपकार्यवाह)
मा डॉ प्रकाश दीक्षित (उपकार्यवाह)
मा प्राचार्य डॉ निवेदिता एकबोटे (उपकार्यवाह)
मा श्री दीपक मराठे (उपकार्यवाह)
यांच्या उपस्थितित पार पडला.

संस्थेला अर्शिवाद देण्यासाठी कार्यक्रमास लाभलेली मान्यवर उपस्थिती : प्रोग्रेसव्ह एज्युकेशन सोसायटीचे संस्थेचे अध्यक्ष विघ्नहारी महाराज देव, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ कुलकर्णी, श्री. मिलिंद एकबोटे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी सदस्य संतोष ढोरे, सिनेट सदस्य सुमित ढोरे डॉ. निता मोहिते, विनायक आंबेकर, कृष्णा भांडलकर, क्रीडा संचालक डॉ. सुदामा शेळके, माजी क्रीडा संचालक डॉ. दिपक माने, माजी कुलसचिव डॉ. विजय खरे, आदी सदस्य, भाजपा प्रदेशाध्यक्ष धीरज घाटे, भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक, महानगरपालिका आयुक्त माधव जगताप, नगरसेविका ज्योत्स्ना कुलकर्णी, नगरसेवक अपूर्व खाडे, पूजा जागडे, स्वरदा बापट, रवींद्र साळेगावकर, प्रा. डॉ. मनोहर सानप, पत्रकार व व्यावसायीक नरेंद्र जोशी, माजी नगरसेवक संदीप काळे, ॲड. एस. के जैन, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कॉसमॉस बँकेचे मॅनेजर उदय लेले, जनता बँकेचे डायरेक्टर व आंबेगाव शिवसृष्टीचे अध्यक्ष जगदीश कदम, भारतीय संस्कृती संरक्षण संस्था सैनिकांना राखी पाठवणारी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. नंदकिशोर एकबोटे आणि पदाधिकारी, ज्येष्ठ शिवसैनिक श्री. विजयराव तळवलक, माजी प्राचार्य डॉ. राजेद्र झुंजारराव, हिमालयन मोहिमेचे ज्योती कुमारजी, मेडिकल तज्ञ डॉ. प्रमोद उमरजी माजी विद्यार्थी ॲड. कदम, मुकुल माधव फाउंडेशन महाराष्ट्र समन्वयक सचिन कुलकर्णी तसेच शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६

श्री व्यंकटेश भोला , श्री औदुंबर घनवट, श्री गाढवे , श्री रामदास दातार, मा उजमा शेख
या मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सदस्य, संस्थेवर प्रेम करणारे हितचिंतक, शिक्षणविभागातील अधिकारी, साविञिबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महानगरपालिका, उच्च शिक्षण विभागातील पदाधिकारी, बँक अधिकारी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते व
अनेक क्षेत्रातील मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी संस्थेच्या व कार्याध्यक्षांच्या पुढिल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६

PUNE BULLETIN
आपल्या विश्वासाचा आवाज

## 93 वर्षांची प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची दिमाखदार वाटचाल; वर्धापनदिन उत्साहात साजरा

च्या कडून **प्रतिनिधी** - April 20, 2026



पुणे : शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी चा 93 वा वर्धापनदिन रविवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित स्नेहमेळाव्यात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेत भविष्यातील योजनाही मांडण्यात आल्या.

सन 1934 मध्ये 'अक्षय तृतीया' या शुभमुहूर्तावर दिवंगत गुरुवर्य शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या पाच शिक्षक सहकाऱ्यांनी या संस्थेची स्थापना केली. "प्रोग्रेसिव्ह" आणि "मॉडर्न" या मूल्यांवर आधारलेली संस्था काळानुरूप बदल स्वीकारत आजही शिक्षणात नावीन्य टिकवून आहे. त्या काळी लावलेले छोटे रोपटे आज 93 वर्षांनंतर एका भक्कम वटवृक्षात रूपांतरित झाले आहे.
सध्या संस्थेच्या अंतर्गत तब्बल 65 शाळा व महाविद्यालये कार्यरत असून सुमारे 65 हजार विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य केले जात आहे. कला, क्रीडा, शिक्षण, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रात संस्थेचे विद्यार्थी उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. संस्थेच्या 12 महाविद्यालयांपैकी 7 महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा मिळाला असून उर्वरित महाविद्यालयांनाही लवकरच स्वायत्तता मिळवून देण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. सर्व महाविद्यालये NAAC मानांकित असून तांत्रिक संस्थांना NBA मानांकन प्राप्त आहे.

कार्यक्रमात बोलताना कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी सांगितले की, "शिक्षकांनी सुरू केलेली ही संस्था आजही शिक्षकच चालवत आहेत. त्यामुळे शिक्षणाचे व्यापारीकरण झालेले नाही. विद्यार्थ्यांचे व कर्मचाऱ्यांचे हित जपत संस्थेने गुणवत्ता टिकवली आहे." पुढील काळात मोशी येथे 22 कोटी रुपयांचा शैक्षणिक प्रकल्प उभारण्याची योजना असून इंजिनिअरिंग महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विषयासाठी 10 कोटी रुपयांची अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. या प्रयोगशाळेचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्याचा

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६

प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष विघ्नहारी महाराज देव, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ कुलकर्णी, मिलिंद एकबोटे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ, बँक अधिकारी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष विघ्नहारी महाराज देव, सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ कुलकर्णी, मिलिंद एकबोटे तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ, बँक अधिकारी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने संस्थेच्या प्रगतीचा गौरव करण्यात आला तसेच पुढील वाटचालीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या. शिक्षण क्षेत्रात सातत्याने गुणवत्ता आणि आधुनिकता जपत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने उभारलेला हा आदर्श आगामी काळातही अधिक बळकट होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी वर्धापनदिन समारंभ १९.४.२०२६

प्रभात

## 'प्रोग्रेसिव्ह'चा ९३ वा वर्धापनदिन उत्साहात

### राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांची हजेरी

पुणे, दि. २० - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने आज ९३ वर्षांनंतर आधुनिकता आणि मूल्यांची जोपासना करत आपला दबदबा कायम राखला आहे. संस्थेच्या ९३ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावत संस्थेच्या गौरवशाली वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे संस्थापक गुरुवर्य शंकरराव कानिटकर आणि त्यांच्या पाच शिक्षक सहकाऱ्यांनी सुरू केलेली ही संस्था आजही प्रोग्रेसिव्ह आणि मॉडर्न या शब्दांचा अर्थ सार्थ ठरवत आहे. सध्या संस्थेच्या ६५ शाखांमधून सुमारे ६५ हजार विद्यार्थी ज्ञानार्जन करत असून, १२ महाविद्यालयांपैकी ७ महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. शिक्षकांनी सुरू केलेली ही संस्था आजही शिक्षकांमार्फतच चालवली जात असल्याने येथे शिक्षणाचे व्यापारीकरण झाले नाही, असे गौरवोद्गार कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी काढले.

या सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष विघ्नहारी महाराज देव, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, डॉ. शिवाजीराव कदम, अ‍ॅड. एस. के. जैन, माजी आमदार जगदीश मुळीक, धीरज घाटे, मनपा उपायुक्त माधव जगताप, नगरसेविका ज्योत्स्ना कुलकर्णी, अपूर्व खाडे, पूजा जागडे, स्वरदा बापट आणि रवींद्र साळेगावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व पाहुण्यांचे स्वागत सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे आणि प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले, तर कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख यांनी आभार मानले.



पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या ९३ वा वर्धापनदिनानिमित्त रविवारी शहरातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावून संस्थेला सदिच्छा दिल्या.

Pune City Edition
Apr 21, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

सकाळ

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशनचा वर्धापन दिन उत्साहात

**शिवाजीनगर :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा ९३वा वर्धापन दिन रविवारी (ता. १९) उत्साहात साजरा झाला. 'अक्षय तृतीया'च्या मुहूर्तावर १९३४ मध्ये शंकररावजी कानिटकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संस्थेची स्थापना केली होती. संस्थेच्या अंतर्गत ६५ शाळा व महाविद्यालये कार्यरत असून सुमारे ६५ हजार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी यांनी स्वागत केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, डॉ. पराग काळकर आदी उपस्थित होते.

Pune, Pune-Today
21/04/2026 Page No. 1

# Article on 4th Year of UG Courses under NEP 2020 by Prof. Shamkant Deshmukh, Vice Principal, MCASC, Pune-5

प्रभात



# चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम कागदावरच राहण्याची शक्यता!

**प्रा. शामकांत देशमुख**
उपप्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्र सरकारच्या शासन निर्णयानुसार स्वायत्त महाविद्यालयांतून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून लागू झाली, तर विद्यापीठातील इतर अस्वायत्त संलग्न महाविद्यालयातून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून लागू करण्यात आली. साहजिकच २०२३-२०२४ ला स्वायत्त महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ ला पदवी अभ्यासक्रमाचे तीन वर्षे पूर्ण करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या तरतुदीनुसार चौथ्या वर्षास प्रवेश घेण्यास पात्र ठरतील. किमान २०२६-२०२७ च्या शैक्षणिक वर्षात हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच परंपरागत कला, विज्ञान आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील व विद्यापीठाच्या विभागातील तृतीय वर्ष पूर्ण केलेले विद्यार्थी ज्यांचा CGPA = ७.५ व त्यापेक्षा जास्त गुण आहेत असेच विद्यार्थी पदवीच्या चौथ्या वर्षास प्रवेश घेण्यास पात्र आहेत. ही बाब राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्पष्ट केलेली आहे. त्याचा पुढे उल्लेख शासन निर्णय व विद्यापीठ परिपत्रकातदेखील वेळोवेळी करण्यात आला आहे.

स्वायत्त महाविद्यालयातून व विद्यापीठ विभागातील तृतीय वर्ष उपरोक्त दर्शवलेले गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसमोर चौथ्या वर्षास प्रवेश घेताना संबंधित पदवी अभ्यासक्रमाचे ऑनर्स व रिसर्च असे दोन पर्याय असतील उदा. B.A. (Hons) /B.A. (Research), B.Com. (Hons) /B.Com. (Research), B.Sc. (Hons)/B. Sc. (Research) याप्रमाणे पर्याय असतील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील तरतुदी त्याचबरोबर उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय यास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून नुकतेच चौथ्या वर्षाच्या अभ्यासक्रमासंदर्भात परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. यासर्व बाबींचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये पदवीच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेचे निकष पूर्ण केल्यानंतरही प्रत्यक्षात चौथ्या वर्षात प्रवेश घेताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल किंबहुना याबाबत मोठ्या प्रमाणात संभ्रमावस्था आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. परिणामी, चार वर्षांचा अभ्यासक्रम यंदाच्या शैक्षणिक वर्षाचा (२०२६-२०२७) विचार करता कागदावरच राहण्याची चिन्हे जास्त जाणवत आहे. याबाबींचा ऊहापोह आपण खालील मुद्द्यांमधून समजावून घेऊयात.

पदवी अभ्यासक्रमाचे तृतीय वर्ष गुणपात्रतेचे निकष (CGPA = ७.५) पूर्ण केलेल्या विद्यार्थी चौथ्या वर्षाला सामोरे जाताना अथवा प्रवेश घेताना संबंधित महाविद्यालयात संबंधित विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम व त्या अभ्यासक्रमास विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध असल्यास त्या अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष या विद्यार्थ्यांना ऑनर्स पदवीचे चौथे वर्ष म्हणून पूर्ण करता येईल. ज्या महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध नसेल अशा महाविद्यालयांना चौथ्या वर्षाची स्वतंत्र परवानगी विद्यापीठाने घालून दिलेल्या विहित प्रक्रियेद्वारे वेळेपूर्वी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-२०१७ मधील तरतुदीप्रमाणे अशा महाविद्यालयांनी मागील वर्षाच्या ३० सप्टेंबरपर्यंत चौथ्या वर्षाचा प्रस्ताव पाठविणे अभिप्रेत आहे. जी तारीख दि. ३०/९/२०२५ उलटून गेली आहे तर स्वायत्त महाविद्यालयांच्या बाबतीत दि. ३१/३/२०२६ ही तारीखदेखील उलटून गेली आहे. पदवी अभ्यासक्रम नैसर्गिक वाढीनुसार चौथ्या वर्षासाठी परवानगी मिळणार नाही असा स्पष्ट उल्लेख परिपत्रकात आहे. अर्थात पदवी अभ्यासक्रम व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची रचना एकरूप आहे की नाही तसेच त्या वर्गाचे एकूण श्रेयांक तसेच पदवी अभ्यासक्रम तृतीय वर्षापर्यंतचे श्रेयांक व चौथे वर्ष पूर्ण करताना विहित करून दिलेले एकूण श्रेयांक (१६० ते १७६ श्रेयांक) च्या मर्यादेत आहेत ना हे पाहणेदेखील महत्त्वाचे ठरणार आहे.

तसेच चौथ्या वर्षाचा कार्यभार, विद्यार्थ्यांना आकारले जाणारे शुल्क, त्याबाबतचे शासनाचे धोरण एकूण चौथ्या वर्षात प्रवेश घेण्यास उत्सुक असणारे विद्यार्थी पात्र विद्यार्थ्यांना यापूर्वी प्रमाणेच इतर पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे उपलब्ध असणारे पर्याय त्यामुळे चौथ्या वर्षाचा अभ्यासक्रम राबविताना महाविद्यालय प्रशासना समोरील कार्यभार, प्राध्यापकांची नियुक्ती, वेतनावरील खर्च, वेतनेतर खर्च आणि प्रत्यक्ष प्रवेश घेतलेल्या चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांची संख्या याचा आर्थिक मेळ बसविणे हे देखील अडचणींचे, जिकिरीचे ठरणार आहे.

अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाच्या शुल्क रचनेच्या बाबतीतदेखील अनेक प्रश्न निर्माण होणार आहेत. पदवीच्या तृतीय वर्षापर्यंतचे शुल्क व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शुल्क यामध्येदेखील मोठी तफावत आहे. उदा. तृतीय वर्षापर्यंत एखाद्या विद्यार्थ्यास ५०,०००/- रु. शुल्क लागू होते आणि असा विद्यार्थी चौथ्या वर्षात प्रवेश घेताना पदव्युत्तर अभ्यासक्रमास सुमारे ८०,०००/- शुल्क लागू असल्यास भरण्यास तयार होईल का? तसेच विद्यार्थ्यास शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप लागू होती ती चौथ्या वर्षासाठी लागू राहाणार किंवा नाही त्याबाबत अजूनही सुस्पष्टता नाही हे लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे चौथ्या वर्षाचा अधिकचा आर्थिक भार पात्र व इच्छुक विद्यार्थी व पालक यांच्यावर येण्याची दाट शक्यता आहे.

तृतीय वर्षाचा निकाल लागल्यानंतर प्रत्यक्षात चौथ्या वर्षात प्रवेश घेण्यास पात्रतेच्या निकषावरून नेमके किती विद्यार्थी इच्छुक असतील याचा अंदाज बांधणे हेदेखील कठीण आहे. याबाबत पुरेसा प्रचार, प्रसार व जागृती विद्यार्थी, पालक व शैक्षणिक क्षेत्रात झालेली जाणवत नाही, ही वस्तुस्थिती आहे ती नाकारून चालणार नाही. उदाहरणार्थ, एखाद्या महाविद्यालयात बी.एस्सी. रसायनशास्त्र अभ्यासक्रमास तृतीय वर्षात एकूण ५० विद्यार्थी आहेत. त्यापैकी निकाल लागल्यानंतर सुमारे ८०% विद्यार्थी हे उत्तीर्ण होतात असे प्रमाण जर धरले तर ५० पैकी ४० विद्यार्थी हे उत्तीर्ण होतील. त्यातील सुमारे २०% विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षाच्या प्रवेश निकषानुसार CGPA = ७.५ पेक्षा जास्त गुण मिळाले असे जर गृहीत धरले तर आठ विद्यार्थी हे चौथ्या वर्षाला प्रवेश घेण्यास पात्र ठरतील; परंतु या विद्यार्थ्यांना इतर अभ्यासक्रमांचे व इतर संस्थांचे तसेच विद्यापीठातील अभ्यासक्रमांचे देखील पर्याय असतील. तसेच या पात्र विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम असल्यास ऑनर्सचा पर्याय उपलब्ध असेल तर ज्यांना संशोधन करण्यात रस असल्यास व महाविद्यालयात संशोधन केंद्र असल्यास रिसर्च हा पर्याय उपलब्ध असेल. परंतु असे हाताच्या बोटावर मोजण्याइतके विद्यार्थी चौथ्या वर्षात प्रवेशित झाले तर कार्यभार, आवश्यक असलेले प्राध्यापक, वेतन व वेतनेतर खर्च, विद्यार्थ्यांना आकारण्यात येणारे शुल्क याचा ताळमेळ घालणे अवघड होणार आहे. इतर महाविद्यालयांतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना थेट प्रवेशाचा (लॅटरल एन्ट्री) पर्याय जरी उपलब्ध असला तरी नेमके किती विद्यार्थी यासाठी इच्छुक असतील याचा अंदाज बाळगणे अवघड आहे. ज्या पात्र विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षाचा रिसर्च या पर्यायाची निवड करावयाची असल्यास अथवा संशोधनाची आवड असल्यास अशा महाविद्यालयात संबंधित विषयाचे विद्यापीठ मान्यताप्राप्त संशोधन केंद्र असणे आवश्यक आहे. संबंधित महाविद्यालयात त्या विषयाचे संशाधन केंद्र नसल्यास चौथ्या वर्षात संशोधन पर्याय निवडता येणार नाही. तसेच संशोधन पर्याय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या विषयाचा स्वतंत्र अभ्यासक्रम, त्या अभ्यासक्रमाचा कार्यभार, लागणारे प्राध्यापक, त्यांची अर्हता, वेतन व वेतनेतर खर्च हा ताळमेळ व त्याचा गुंता हा न सुटणारा आहे. नुकतेच शासनाद्वारे जारी करण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रति मान्यताप्राप्त मार्गदर्शक जास्तीत जास्त पाच विद्यार्थी रिसर्च अभ्यासक्रमास प्रवेशित करता येतील.

विविध अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाचा कार्यभार अतिरिक्त कार्यभार ठरवला गेला असून, त्यासाठी विद्यार्थी पालकांना शुल्क आकारले जाणार आहे. शासनाने त्या वर्षाच्या कार्यभाराप्रमाणे लागणाऱ्या प्राध्यापक व त्यांना दिले जाणाऱ्या वेतनाची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची व संस्थेची राहील अशी भूमिका घेऊन एका अर्थाने ही जबाबदारी झटकली आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

ज्या महाविद्यालयांमध्ये तृतीय वर्षापर्यंत शासनाचे अनुदान होते आणि चौथ्या वर्षात अनुदान नसल्याने शुल्क रचनेत मोठी तफावत असणार आहे. हा आर्थिक भार विद्यार्थी व पालक यांना न पेलणारा आहे. तर काही महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम हेदेखील अनुदानित आहे. अशा परिस्थितीमध्ये चौथ्या वर्षाच्या अभ्यासक्रमामुळे वाढणारा कार्यभार त्यासंबंधीचे मनुष्यबळ प्राध्यापकांचे वेतन व वेतनेतर खर्च याबाबत उदासीनता आहे. अनेक महाविद्यालयांमध्ये पदवीपर्यंतचे अभ्यासक्रम अनुदानित तथा विनाअनुदानित तत्त्वावर सुरू आहेत. पण पदव्युत्तर अभ्यासक्रम अथवा संबंधित विषयाची संशोधन केंद्रे नाहीत. संशोधन केंद्र सुरू करताना पदव्युत्तर अभ्यासक्रम महाविद्यालयात असणे अनिवार्य आहे. तर संबंधित विषयाचे संशोधन केंद्र असण्यासाठी किमान दोन पूर्णवेळ मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शक असणे आवश्यक आहे. थोडक्यात, कागदोपत्री आराखडा दिसायला खूप छान आहे पण प्रत्यक्षात अंमलबजावणीमध्ये अडचणी अनेक आहेत.

थोडक्यात, किमान या शैक्षणिक वर्षात २०२६-२०२७ मध्ये ही बाब फक्त स्वायत्त महाविद्यालयांना लागू आहे. तर इतर संलग्न महाविद्यालयांना हा प्रश्न शैक्षणिक वर्ष २०२७-२०२८ पासून भेडसावेल. त्यामुळे इतर अस्वायत्त महाविद्यालय व प्रशासनात या अनुषंगाने कोणतीही तयारी सुरू नाही. पण स्वायत्त महाविद्यालय आज जात्यात तर इतर अस्वायत्त संलग्न महाविद्यालय सुपात आहेत. परंतु या गंभीर प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार होण्याची गरज आहे. तसे न झाल्यास राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मूळ हेतूस बाधा पोहचणार असून उद्देश सफल होताना दिसणार नाही.

चौथ्या वर्षाचे प्रवेश व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची मान्यताप्राप्त प्रवेश संख्या याबाबत साशंकता आहे. चौथ्या वर्षाचे प्रवेश हे स्वतंत्र धरले जातील की पदव्युत्तर अभ्यासक्रम मान्य प्रवेश संख्येतच धरले जातील याबाबत स्पष्टता नाही. चौथ्या वर्षाच्या प्रवेशासंदर्भात बऱ्याचशा बाबी संदर्भात या विद्यापीठ व शासन स्तरावर सुस्पष्टता नसल्याने विद्यार्थी व पालक यांच्या चौथ्या वर्षाच्या प्रवेशा संबंधीच्या प्रश्नांचे व शंकांचे समाधानकारक निरसन करणे महाविद्यालय प्रशासनास व शिक्षक वर्गास अडचणीचे होऊन बसले आहे. परिणामी, बरेचसे पात्र विद्यार्थी देखील चौथ्या वर्षाचा विचार न करता त्याकडे पाठ फिरवतील अशी सद्यपरिस्थिती आहे.

चार वर्षांची पदवी उत्तीर्ण करून १०+२+४ असे एकूण १६ वर्षांचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर परदेशातील नामांकित विद्यापीठात पुढील पदव्युत्तर शिक्षण घेणे सोईचे होईल. या उदात्त हेतूने चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमाचा विचार केला गेला होता. चार वर्षे पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रम एक वर्षाचा असणार आहे. ह्या जरी काही जमेच्या बाजू असल्या तरी त्या प्रत्यक्षात उतरविण्यात बऱ्याच अडचणी आहेत. त्यामुळे चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम किमान या शैक्षणिक वर्षात तरी कागदावरच राहतील, असे चित्र आहे.

Rupgandh Edition
Apr 19, 2026 Page No. 4
Powered by: erelego.com

# Events Conducted by Library during April 2026

## *1. Mahatma Jyotiba Phule Jayanti: 11th April 2026*

On 11.04.2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Mahatma Jyotiba Phule Jayanti' as per Government of Maharashtra GR.

Under the guidance of Principal Dr. Nivedita Ekbote Madam, Vice Principal and Head, Department of Computer Science Prof. Shamkant Deshmukh Sir, Vice Principal Prof. Dr. Sachin Sakate, Librarian Dr. Shantashree Sengupta, Vice Principal Prof . Dr. Rohidas Jagtap, Vice Principal Prof. Dr. Vijay Gaikwad, Head Department of Electronic Science Dr. Milind Bodke and teaching and non-teaching staff members paid their respect to the great reformer Mahatma Phule.

Prof. Shamkant Deshmukh Sir mentioned that Jyotirao Govindrao Phule was an Indian social activist, thinker, anti-caste social reformer and writer from Maharashtra. Sir mentioned how Mahatma Phule's work extended to many fields, including eradication of untouchability and the caste system and for his efforts in educating women and exploited caste people. Mahatma Phule and his wife, Savitribai Phule, were pioneers of women education in India. He, along with his followers, formed the Satyashodhak Samaj (Society of Truth Seekers) to attain equal rights for people from exploited castes. People from all religions and castes could become a part of this association which worked for the upliftment of the oppressed classes. Mahatma Phule is regarded as an important figure in the social reform movement in Maharashtra.

I am thankful to the Library Staff members who were present during the program.

**Regards,**

**Dr. Shantashree Sengupta,**

**Librarian.**




**महात्मा ज्योतिबा फुले**
**(दि.११ एप्रिल, १८२७ – २८ नोव्हेंबर, १८९०)**
**(अल्प परिचय)**

महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ समाज सुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत. गोविंदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दांपत्याचे ज्योतीराव हे दुसरे अपत्य. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या व्यवसायामुळे फुले हे नाव पडले. ज्योतीरावांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. ज्योतीरावांना इंग्रजी शिक्षणाचे वेध लागले होते. त्यात अनेक अडचणी आल्या, तरी शालान्त परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पुरे केले. इंग्रजीतील उच्च दर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त केली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शरीरशिक्षणही घेतले. लहूजीबुवा यांच्यापाशी दांडपट्टा शिकले, मल्लविद्या संपादन केली. शिक्षण पुरे केल्यावर सन १८४० मध्ये ज्योतीरावांचा विवाह खंडोजी नेवसे पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. सावित्रीबाईचे शिक्षण ज्योतीरावांनीच पुरे केले. त्या स्वयंस्फूर्तीने ज्योतीरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात जन्मभर सहभागी झाल्या.

ज्योतीरावांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर, सूत्रबद्ध सारांश सांगितला आहे. "विद्येविना मति गेली; मतीविना नीति गेली; नीतीविना गति गेली। गतीविना वित्त गेले; वित्ताविना शूद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले." त्यांनी हा निष्कर्ष "*शेतकऱ्याचा आसूड*" (१८८३) मध्ये सांगितला आहे. त्यांच्या सगळ्या सत्यशोधक चळवळीचा भावार्थ यात आला आहे. दैन्यावस्थेतून बाहेर पडण्याकरिता लोकशिक्षण हाच उपाय आहे, असे त्यांचे मत होते.

ज्योतीराव फुले यांनी "बालहत्या प्रतिबंधक गृहा" ची स्थापना केली (१८६३). या गृहात स्त्रियांच्या बाळंतपणाचीही सोय केली होती. ज्योतीरावांनी दत्तक घेतलेला यशवंत नावाचा मुलगा काशीबाई नावाच्या विधवेचा मुलगा होता. विधवांच्या केशवपनाची चाल बंद व्हावी म्हणून त्यांनी चळवळ उभी केली व त्या करीता न्हाव्यांचा संपही घडवून आणला.

अस्पृश्य व दलितांच्या प्रश्नालाही त्यांनी चालना दिली. अस्पृश्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ही एक अत्यंत गंभीर अशी कायमची समस्या लक्षात घेऊन आपल्या वाड्यातील पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला केला.

बहुजन समाजावरील मानसिक गुलामगिरी स्पष्ट करण्याकरिता "*ब्राह्मणांचे कसब*" (१८६९), "*गुलामगिरी*" (१८७३), "*सत्सार*" (अंक १ व २, १८८५) इ. निबंध लिहिले.

ज्यांतीरावांचे इतर वाङ्मय पुढीलप्रमाणे आहे : "*छत्रपति शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा*" (१८६९), *हंटर-शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन* (मूळ इंग्रजी-१८८२), "*इशारा*" (१८८५).

******

(स्रोत – सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)

# Events Conducted by Library during April 2026


















# Events Conducted by Library during April 2026

















# Events Conducted by Library during April 2026















# Events Conducted by Library during April 2026

## *2. Bharat Ratna Dr.Babasaheb Ambedkar Jayanti: 14th April 2026*

Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Bharat Ratna Dr.Babasaheb Ambedkar Jayanti on 14.04.2026.

The celebrations of the 'Knowledge Day' started from Saturday, 13.04.2025 by organising 'READATHON' (14 hours Abhyas Abhiyan) from 07:00 a.m. to 09:00 p.m. Several students, teaching and non-teaching staff participated in the Reading Movement which aims to inculcate reading habits.

On 14.04.2026, in the presence of Respected Principal Dr. Nivedita Ekbote; Prof. Shamkant Deshmukh, Secretary, P.E.Society; Dr. Sachin Sakate, Vice Principal, Faculty of Science; Vice Principal Dr.Vijay Gaikwad, Faculty of Commerce; Vice Principal Dr. Rohidas Jagtap ; Vice Principal Prof. Alka Kamble, Faculty of Arts; Junior College Supervisor Prof. D.D. Khandale; Head, Department of Chemistry Prof. Dr. Harsh Gaikwad; Head, Department of Electronic Science Dr. Milind Bodke, Dr. Prabhakar Varade, College Registrar Ganesh Sathe, teaching and non-teaching staff members and students were present for the program and paid respect to Dr. Babasaheb Ambedkar. A short movie made by ABP Majha Channel and Rare Interview Clip from BBC World was played by Prof. Ashok Kamble, NCC Officer on Dr.B.R.Ambedkar.

Dr. Milind Bodke presented Bhim Geet.

Principal Madam expressed her views on the multifaceted personality and the First Law Minister of Independent India.

All the participants of the 14 Hours Abhyas Abhiyan were presented with Certificate of Participation.


Principal Madam and Dr. B. R.Ambedkar Shikshak Shikshakettar Sanghatna presented several books by and on Bharat Ratna Dr.B.R.Ambedkar.

Dr. Shantashree Sengupta, Librarian did comparing of the Program and presented the Vote of Thanks.

**Regards,**

**Dr. Shantashree Sengupta**

**Librarian.**



# Events Conducted by Library during April 2026






# Events Conducted by Library during April 2026

















# Events Conducted by Library during April 2026











# Events Conducted by Library during April 2026









# Events Conducted by Library during April 2026













# Events Conducted by Library during April 2026














# Events Conducted by Library during April 2026














# Events Conducted by Library during April 2026


















# Events Conducted by Library during April 2026


















# Events Conducted by Library during April 2026

















# Events Conducted by Library during April 2026













# Events Conducted by Library during April 2026













# Events Conducted by Library during April 2026

## सलग १४ अभ्यास अभियान अहवाल

भारतीय राजघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना **सलग १४ तास** अभ्यासाच्या माध्यमातून एका विशिष्ठ पद्धतीने महामानवाला अभिवादन करण्याच्या हेतूने महाविद्यालयात दि. १३ एप्रिल २०२६ रोजी **"सलग १४ तास अभ्यास अभियान"** हा कार्यक्रम ग्रंथालयामध्ये समन्वयक डॉ. मिलिंद बोडके यांच्या नियोजनात संपन्न झाला. सदर अभियानात ५० विदयार्थी व १० शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. सलग १४ तास अभ्यास अभियानाची वेळ हि **सकाळी ७:०० ते रात्री ९:०० वाजेपर्यंत** असल्याने अभियानाची सुरुवात सकाळी ठीक ७:०० वाजता डॉ. संदीप सानप, इंग्रजी विभाग प्रमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची दीप-धूप पूजा व वंदना घेऊन केली. त्यानंतर ११:०० वाजता सलग १४ अभ्यास अभियान कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. मिलिंद बोडके, इलेक्ट्रॉनिक सायन्स विभागप्रमुख यांच्या समवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नानापेठ, पुणे चे प्राचार्य डॉ. विलास कांबळे यांनी अथियानास सदिच्छा भेट दिली व सहभागी विद्यार्थ्यांना अभियानामागची प्रेरणा व हेतू याबद्दल मार्गदर्शन केले. सलग १४ तास अभ्यास अभियानात सहभागी झालेल्या सर्वांची ग्रंथालयातील व्यवस्था ग्रंथपाल डॉ. शांताश्री सेनगुप्ता मॅडम व त्यांच्या सहकार्यांनी उत्तमप्रकारे पार पाडली. सर्व सहभागींना चहा, नाष्टा व दुपारच्या जेवणाची व्यवस्था महाविद्यालयाच्यावतीने करण्यात आली. सदर अभियानाची सांगता रात्री ठीक ९:०० वाजता डॉ. हर्ष गायकवाड, रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आली. दि. १४ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेत सलग १४ तास अभ्यास अभियानात सहभागी झालेल्या सर्वांना मा. प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे व प्रा. शामकांत देशमुख यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे वितरित करण्यात आली.

# Events Conducted by Library during April 2026




सलग १४ तास अभ्यास अभियानात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मा. प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे पत्रांचे वितरण




समन्वयक डॉ. मिलिंद बोडके, डॉ. संदीप सानप, प्रा. तानाजी सोनवणे , डॉ. भारत काळबागे, डॉ. निशा भंडारे यांच्या उपस्थितीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नानापेठ, पुणे चे प्राचार्य डॉ. विलास कांबळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.

# Events Conducted by Library during April 2026



सलग १४ तास अभ्यास अभियानात सहभागी झालेले विद्यार्थी




सलग १४ तास अभ्यास अभियानात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना
प्रा. शामकांत देशमुख यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे पत्रांचे वितरण

# Events Conducted by Library during April 2026




दि. १४ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेचे संचलन करताना ग्रंथपाल डॉ. शांताश्री सेनगुप्ता

# Events Conducted by Library during April 2026

## *3. Mahatma Basweshwar Jayanti: 19th April 2026*

On 19.4.2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Mahatma Basweshwar

Jayanti as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Dr. Nivedita Ekbote Madam, Vice Principal Prof. Dr. Sachin Sakate , Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Mahatma Basweshwar.

Dr. Sakate Sir mentioned that Mahatma Basveshwar Maharaj was an Indian 12th-century statesman, philosopher, poet,social reformer and Lingayat saint in the Shiva-focussed Bhakti movement, and Hindu

Shaivite social reformer during the reign of the Kalyani Chalukya/Kalachuri dynasty. Mahatma Basveshwar spread social awareness through his poetry, popularly known as Vachanaas. He rejected gender or social discrimination, superstitions and rituals but introduced Ishtalinga necklace, with an image of the Shiva Liṅga to every person regardless of his or her birth, to be a constant reminder of one's bhakti (devotion) to Shiva.

As the Chief Minister of his kingdom, he introduced new public institutions such as the Anubhava Mantapa (or, the "hall of spiritual experience"), which welcomed men and women from all socio-economic backgrounds to discuss spiritual and mundane questions of life, in open. He is also known as Bhaktibhandari (literally, the treasurer of devotion), Basavanna. The community he helped form is also known as the Sharanas. Basava taught that every human being was equal, irrespective of caste, and that all forms of manual labor was equally important.

I am thankful to the library staff members who were present during the programme.

**Regards,**
**Dr.Shantashree Sengupta,**
**Librarian.**





# Events Conducted by Library during April 2026

### महात्मा बसवेश्वर

(सन ११३१-११६७)

(अल्प परिचय)

वीरशैव धर्माचे पुनरूज्जीवन करणारी एक महान विभूती. कर्नाटक ही त्यांची कर्मभूमी. धर्म, समाज, तत्त्वज्ञान, वाङ्मय, राजकारण इ. क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे. त्यांचा जन्म वागेवाडी (जि. विजापूर) येथे झाला. त्यांचा जन्म वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते. दरसाल त्याच दिवशी बसवेश्वर जयंती साजरी केली जाते.

महात्मा बसवेश्वर यांच्या आईचे नाव मादलांबिके व वडिलांचे मादिराज होते. बसवेश्वरांना शिवाचा अवतार मानतात. वयाच्या आठव्या वर्षी मुंजीची तयारी झाल्यावर "मला आधीच दीक्षा मिळाली आहे" असे म्हणून त्यांनी मुंज करून घ्यावयाचे नाकारले आणि घर सोडून ते कुडलसंगम (जि. विजापूर) येथे निघून गेले. कुडलसंगम हे स्थान कृष्णा व मलप्रभा यांच्या संगमावर आहे. कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञाने इत्यादींचा अभ्यास केला.

बसवेश्वरांचा उदय होण्यापूर्वी कर्नाटकात अनेक धर्म व पंथ प्रचलित होते. परंतु ही संयुक्त धर्मपरंपरा अवनत अवस्थेतच होती. या पार्श्वभूमीवर बसवेश्वरांनी शिव हा एकमेव ईश्वर असल्याची घोषणा करून शिवोपासनेचा पुरस्कार केला. त्यांच्या उत्कट शिवभक्तीमुळे त्यांना भक्तिभांडारी असे नाव प्राप्त झाले. ते कुडलसंगम येथील संगमेश्वराचे निष्ठावंत भक्त होते. त्यांनी ज्ञान, भक्ती व कर्म यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दया, अहिंसा, सत्य, सदाचार, नीती, शील इत्यादींचा प्रचार केला. एकाच देवाची भक्ती करा, भूतदया पाळगा, प्रेमाने वागा, परोपकार करा अशी त्यांची शिकवण होती.

बसवेश्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली "शिवानुभवमंटप" म्हणजेच "अनुभवमंटप" ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय. वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत. बसवेश्वरांनी धर्मप्रसारासाठी संन्यास घेतला नाही, भाष्ये लिहिली नाहीत वा प्रवासही केला नाही, परंतु मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जागृती केली. येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच कन्नड साहित्यामध्ये वचनसाहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. या मंटपातील शून्यपीठाचे अध्यक्षपद *अल्लमप्रभू* (बारावे शतक) यांना देण्यात आले होते. येथे होणाऱ्या चर्चेच्या माध्यमातून बसवेश्वरांनी वेगवेगळ्या जातिजमातींच्या लोकांमध्ये बंधुभाव आणि विचार स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली.

महात्मा बसवेश्वर यांना यज्ञयागांतील पशुहत्या, वर्णभेद, वर्गभेद व जातीभेद मान्य नव्हते. त्यामुळे सनातनी लोकांनी त्यांच्याविषयी बिज्जल राजाचे मन कलुषित केले. शेवटी बिज्जल राजाचे सैन्य व बसवेश्वरांचे अनुयायी यांच्यात झगडा सुरु झाला. तेव्हा या हिंसाचाराला कंटाळून ते कुडलसंगम येथे गेले व त्यांनी तेथे समाधी घेतली. कुडलसंगम येथे त्यांची समाधी आहे. दरवर्षी श्रावण शुध्द प्रतिपदेला त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)











# Events Conducted by Library during April 2026

## *4. Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti: 30th April 2026*

On 30.04.2026, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Rashtrasant Tukdoji Maharaj Jayanti as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Prof. Dr. Nivedita Ekbote Madam, Librarian Dr. Shantashree Sengupta and Library Staff paid their respect to Rashtrasant Tukdoji Maharaj.

Rashtrasant Tukdoji Maharaj was born in Amravati District of Maharashtra and was a disciple of was a disciple of Aadkoji Maharaj. Tukdoji Maharaj was involved in social reforms in the rural regions of Maharashtra, including construction of roads. He wrote 'Gramgeeta' which describes means for village development. Many of the development programs started by him have continued to work efficiently after his death. Tukdoji Maharaj once attended a World Religions and World Peace Conference in Japan. Saint Tukdoji Maharaj performed rigorous penance and spiritual exercises in self-realisation. He also was a great orator and a musician who composed more than 3000 bhajans (spiritual poems) in Hindi and Marathi, having performed for the spiritual teacher Meher Baba in 1937 and 1944. He has also written many articles on Dharma, society, nation and education. He studied the existing religious sects and other schools of thought and discussed religious and secular problems of the devotees. He was determined to re-define socio-Spirituality and revitalise and awaken the nation. Saint Tukdoji Maharaj worked immensely for the Status of Women in Society. In 2005, the Nagpur University was renamed to Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University.

I am thankful to the library staff members who were present during the programme.

**Regards,**

**Dr. Shantashree Sengupta,**

**Librarian.**






# Events Conducted by Library during April 2026

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

**(दि.३० एप्रिल, १९०९-१० नोव्हेंबर, १९६८)**

**(अल्प परिचय)**

महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, भक्त, कवी व समाजसुधारक. मूळ नाव माणिक बंडोजी ठाकूर. विदर्भात यावली (जि. अमरावती) येथे जन्म. ठाकूर घराण्याचे कुलदैवत पंढरपूरचा विठोबा असल्याने लहानपणापासूनच त्यांना ध्यान, भजन, पुजन या गोष्टींची आवड निर्माण झाली. मराठी तिसरीपर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांनी शाळा सोडली. वरखेडला (जि. अमरावती) आजोळी असताना आडकूजी महाराजांना त्यांनी गुरू केले. "तुकड्या म्हणे" या वाक्याने संपणारे असंख्य अभंग त्यांनी लिहिले. यामुळे ते तुकडोजी महाराज म्हणून ओळखले जाऊ लागले. ईश्वरभक्ती, सद्गुणांचा उपदेश, सामाजिक जागृती इ. विषय त्यांनी आपल्या कीर्तनांतून हाताळले, म्हणूनच त्यांना जनतेने "राष्ट्रसंत" अशी उपाधी देऊन गौरविले.

तुकडोजी महाराजांचे कवित्व अस्सल आहे. कीर्तने व खंजिरी भजने यांच्या माध्यमातून समाजसेवा हेच तुकडोजींचे ध्येय होते. त्यासाठी परंपरागत अनिष्ट रूढी, जाति, धर्म, पंथ,भेद, अंधश्रद्धा इ. समाजघातक गोष्टींवर कठोर प्रहार करून ईश्वराचे विशुद्ध स्वरूप त्यांनी लोकांसमोर मांडले. त्यामुळे सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे लोक त्यांच्याकडे आकृष्ट झाले. आत्मसंयमाचा आणि देशभक्तीचा प्रचार करण्यासाठी त्यांनी अविश्रांत श्रम केले. गावोगावी "गुरुदेव सेवा मंडळे" स्थापन केली. व्यायामाचे महत्त्व सांगण्यासाठी "*आदेशरचना*" हा ग्रंथ त्यांनी लिहिला.

राष्ट्रीय विचारांचा पुरस्कार त्यांनी सन १९३० सालच्या सत्याग्रहात भाग घेऊन केला. गांधीजींसारख्या राष्ट्रनेत्यांबरोबर त्यांचा संबंध आला. तुकडोजी महाराजांनी राष्ट्रकार्याकरिताच आपले जीवन समर्पित केले. सन १९३६ साली गांधीजींच्या सहवासात राजेंद्र बाबू, पं. नेहरू, मौलाना आझादप्रभृती राष्ट्रनेत्यांशी त्यांचा परिचय झाला. "भारत सेवक समाज" यात त्यांनी गुलझारीलाल नंदाजींबरोबर काम केले. आपल्या मतांच्या प्रचारार्थ त्यांनी विपुल ग्रंथरचना केली. त्यांची सुमारे चाळीस पुस्तके प्रसिद्ध आहेत. ४१ अध्यायांचे ४,६७५ ओवीसंख्या असलेले "*ग्रामग्रंथ*" हे त्यांचे प्रसिद्ध काव्य होय. त्यांनी हिंदी व मराठी अशा दोन्ही भाषांत काव्यरचना केली. त्यांचे कवित्व आधुनिक संतप्रवृत्तीचे निदर्शक आहे. सन १९४२ च्या आंदोलनात भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात त्यांनी "*सुविचारस्मरणी*" हा ग्रंथ लिहिला. स्वातंत्र्यानंतर भूदान, अस्पृश्योद्धार, जातिनिर्मूलन इ. कार्याकडे त्यांनी विशेष लक्ष पुरविले.

सर्व धर्म, पंथ जाती यांच्या पलीकडे असलेल्या ईश्वराचे स्वरुप ते आपल्या भजनांतून प्रकट करीत. ईश्वराचे ज्ञान करुन घेऊन व्यक्तिविकास व समाज जागृती केली पाहिजे, असे ते म्हणत. धार्मिक एकात्मता निर्माण करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला.

*****

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)
















# Events Conducted by Departments in April 2026

# *Department of Computer Science*

**P.E. Society's**
**Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous)**
**Shivajinagar, Pune-411005**

[To be removed on 18-04-26] [To be put on 28-03-26]

***Department of Computer Science***

**IMPORTANT NOTICE**

**M.Sc. (Computer Science)-II & M.Sc.(Computer Application)-II**

**Guidance session for Industrial Training Project and Research Project**

This is to inform all the students of above mentioned classes that a guidance session for 'Industrial Training Project' and 'Research Project' would be conducted by Vice Principal & Head, Department of Computer Science, Prof. S.S. Deshmukh.

**Details of the session are as follows:**

**Day/Date: Saturday, 18th April 2026**

**Time: 11:00 AM**

**Venue: Bharatratna Swarsamradni Lata Mangeshkar Sabhagruha, MCASC (New building)**

**Students should note that attendance for the session is compulsory.**

**Prof. Meghmala Patil**
**[Course Coordinator, M.Sc. CS]**

**Prof. Dr. Kalyani Salla**
**[Course Coordinator, M.Sc. CA]**

**Prof. S.S. Deshmukh**
**[Vice-Principal,**
**Head, Dept. of Computer Sc.]**

# *Department of Computer Science*

Sir/Madam,

Today an orientation session on the 'Industrial Training Project Examination' was delivered by our Head and Vice Principal, respected, Prof. S. S. Deshmukh Sir, for M.Sc. Computer Science and M.Sc. Computer Application, Part II, Semester IV students in the New Assembly Hall.

Sir provided valuable insights into the significance of the Industrial Training Project Examination, along with guidance on crafting an impactful self-prepared presentation, maintaining proper documentation, adhering to professional ethics within the organization, following an appropriate dress code, and upholding decorum during the project evaluation.

He also explained the assessment framework in detail.

He further highlighted the importance of maintaining politeness, humility and a receptive attitude towards constructive feedback.

Discipline-specific recommendations were shared to enhance the quality and effectiveness of the presentations.

The necessity of dedicated preparation and consistent coordination with the Internal Guide for ongoing Internal evaluation of the Project work was strongly recommended.

Overall the session was highly informative, systematically organized, and meticulously planned, covering even minute aspects of preparation and execution.

Approximately 75 PG students and 6 Faculty members attended the session.

It was truly an enriching experience to attend such an insightful session after a long time.












# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING APRIL 2026*

| Author | Title |
|---|---|
| PAWAR, JAYSINGHRAO | SHIVCHARITRA PASUN AAMHI KAY SHIKAVE ? शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे ? |
| TAKAVALE PRABHAKAR | BUDHBHUSHAN : CHATRAPATI SHRI SAMBHAJI MAHARAJAANI LIHILELA GRANTH बुधभूषण : छत्रपती श्री संभाजी महाराजानी लिहिलेला ग्रंथ |
| KOKATE SHRIMANT | SHIVCHARITRA AANI VICHARPRAVAH शिवचरित्र आणि विचारप्रवाह |
| KHEDEKAR PURUSHOTTAM | SHIVCHARITRA : SHIVAJI YAA TEEN AKSHARI NAAVANE JAG VYAPLELE AAHE शिवचरित्र : शिवाजी या तीन अक्षरी नावाने जग व्यापलेले आहे. |
| AAVAD MILIND A. | KATHA DALIT SANGHARSHYACHYA : AAMHI PAHILELE JIJA कथा दलित संघर्षाच्या आम्ही पाहिलेले जिजा |
| BHOLE BHASKAR LAXMAN | AADHUNIK MAHARASHTRATIL VICHARVANT आधुनिक महाराष्ट्रातील विचारवंत |
| SANKRUTYAYAN RAHUL / SHETE - SAMBHU MEENA | KARL MARX |
| ARSOD SANTOSH | PRABODHAN PANDHARICHA WARAKRI SANT GADAGE BABA प्रबोधन पंढरीचा वारकरी संत गाडगे बाबा |
| PAWAR JAYSINGRAO | SAMAJ KRANTIKARAK RAJARSHI SHAHU MAHARAJ समाज क्रांतीकारक राजर्षी शाहू महाराज |
| MANOHAR YASHWANT | SANGRAM NAYAK MAHATMA JOTIRAO PHULE संग्राम नायक महात्मा जोतीराव फुले |
| KEER DHANANJAY | MAHATMA JOTIRAO PHULE महात्मा जोतिराव फुले |
| KASABE RAOSAHEB | MANAV AANI DHARMCHINTAN मानव आणि धर्मचिंतन |
| KAMBLE UDHAV | DR. AMBEDKAR, DALIT AANI MARXWAD डॉ. आंबेडकर, दलित आणि मार्क्सवाद |
| AMBEDKAR, B. R./ THORAT SHUBHANGI TR. | BHARATATIL JATI : TYANCHI YANTRANA, UDBHAV ANI VIKAS ANI JATICHE UCHHEDAN भारतातील जाती : त्यांची यंत्रणा उद्‌भव आणि विकास आणि जातीचे उच्छेदन |
| RATTU NANAK CHAND / BHOLE BHASKAR / LAXMAN | DR. BABASHAEB AMBEDKAR ANUBHAV AANI AATHAVANI डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी |
| NIKAM SHRIRAM | GANDHI - AMBEDKAR ASPRUSHYA MUKTI SANGHARSH गांधी - आंबेडकर अस्पृश्य मुक्ती संघर्ष |
| MANE DAYANAND | SARVSPARSHI DR. BABASAHEB सर्वस्पर्शी डॉ. बाबासाहेब |
| GAIKWAD DUTTATRAY | BHARATIYA JAL SANSKRUTI AANI DR. AMBEDKARANCHA JAL SAMAJWAD भारतीय जलसंस्कृती आणि डॉ. आंबेडकरांचा जलसमाजवाद |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING APRIL 2026*

| Author | Title |
|---|---|
| BHASKAR ANURAG / DAMALE SAVITA | THE FORESIGHTED AMBEDKAR दूरदर्शी आंबेडकर |
| KAMBLE UTTAM | ASWASTH SHATAKATIL MANGAON PARISHAD अस्वस्थ शतकातील माणगाव परिषद |
| MUNGEKAR BHALCHANDRA | MAULIK AMBEDKAR मौलिक आंबेडकर |
| MESHRAM KESHAV | DHARMANTARACHE ARDH SHATAK धर्मांतराचे अर्ध शतक |



# News Paper Clippings : April 2026




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from* http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into




***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***

## *News Paper Clippings During April 2026*

### *Section: Education*

प्रभात

# विद्यार्थ्यांसाठी सवलतीचे गुण प्रक्रियेत बदल

## शालेय शिक्षण मंडळाच्या भूमिकेने दहावी, बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३१** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी, बारावीच्या परीक्षेतील खेळाडू विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण देण्याच्या कार्यपद्धतीत अधिक सुलभता, जलद व पारदर्शकता आणण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडा धोरण-२०१२ मधील शिफारशीनुसार खेळाडूंना सवलतीचे गुण देण्याची योजना राबविण्यात येते. या प्रक्रियेत महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व विविध क्रीडा संघटनांनी सुचवलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी आणि प्रशासकीय प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व पारदर्शक करण्यासाठी आपले सरकार पोर्टलचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासाअंती, विद्यार्थ्यांवरील कागदपत्रांचा भार कमी करून ही सेवा हमी कायद्याच्या कक्षेतील विषयाला मान्यता देण्यात आलेली आहे.

अनावश्यक टप्पे व कागदपत्रांची कपात करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. अर्जातील एकूण फिल्ड्स २९ वरून २१ इतकी कमी करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे आवश्यक असलेली कागदपत्रे ८ वरून ६ इतकी कमी करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांचा फोटो, स्वाक्षरी ही कागदपत्रे तसेच नाव, पत्ता, जन्मतारीख, शाळेचे नाव व लिंग इ. माहिती त्याच्या हॉल तिकीटवरून आपोआप भरली जाणार आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी क्रीडा गुण सवलतीसाठी तज्ज्ञ म्हणून अर्जाची अंतिम छाननी करून गुणांची निश्चिती करून व शिक्षण मंडळाकडे शिफारस करतील. राज्य शिक्षण मंडळ जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या शिफारशीनुसार वाढीव क्रीडा गुणांना अंतिम मंजुरी देऊन विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेत त्याचा समावेश केला जाणार आहे.

सेवा हमी कायद्याअंतर्गत या सेवेचा समावेश करण्यात आला असून, त्याची अंमलजबाणी मुदतीत करण्यात येणार आहे. खेळाडू विद्यार्थ्यांना दरवर्षी १ जानेवारी ते १५ एप्रिल या कालावधीत ऑनलाइन प्रक्रियेद्वारेच अर्ज सादर करता येतील.

### जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांची शिफारस महत्त्वाची

जिल्हा क्रीडा अधिकारी हे क्रीडा गुणांच्या सवलतीसाठी शिफारस करणारे तज्ज्ञ अधिकारी असल्याने यांच्याकडून शिफारस झालेल्या सर्वच प्रस्तावांना विभागीय शिक्षण मंडळाकडून क्रीडा गुणांची सवलत देणार आहे. शिफारस केलेल्या वाढीव क्रीडा गुणांना अंतिम मंजुरी देऊन विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेत त्याचा समावेश होणार आहे.

Pune City Edition
Apr 01, 2026 Page No. 15
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

पुढारी

# आता दहावी, बारावीचे गुणपत्रक, प्रमाणपत्र एकत्रच मिळणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

यंदाच्या वर्षापासून दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक, तसेच प्रमाणपत्र वेगवेगळे न देता एकत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, संबंधित प्रमाणपत्रावर विद्यार्थ्याचा फोटो देखील लावण्यात येणार आहे. त्यामुळे त्यानुसार विभागीय मंडळांनी कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिले आहेत.

डॉ. माळी यांनी दिलेल्या निर्देशानुसार फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेपासून दहावी-बारावीच्या प्रविष्ट विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र स्वतंत्र न देता ती 'एकत्रित' देण्यात येणार आहेत. तसेच एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचे नाव, वडिलांचे नाव आणि आडनाव या क्रमाने छपाई करण्यात येणार आहे. यासंदर्भात फेब्रुवारी-मार्च २०२६च्या प्रवेशपत्रांवरील छायाचित्र अस्पष्ट असल्यास, त्यावर योग्य फोटो चिकटवून संबंधित मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी स्वाक्षरी करण्याचे निर्देश यापूर्वी दिलेले आहेतच. त्यानुसार ज्या विद्यार्थ्यांचे फोटो दुरुस्त केले आहेत,

- **राज्य मंडळाचे विभागीय मंडळांना निर्देश**

त्यांची माहिती एकत्रित गुणपत्रक व प्रमाणपत्रावर अचूक छापण्यासाठी पुन्हा अपलोड करणे आवश्यक आहे. त्याकरिता मंडळाच्या संकेतस्थळावर फोटो करेक्शन ही लिंक कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याद्वारे फोटो दुरुस्ती करण्यात यावी. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या नावाच्या बदललेल्या क्रमाबाबतही सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविणे गरजेचे आहे. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या नावात त्रुटी उद्भवणार असल्यास त्याबाबतची दुरुस्ती विभागीय मंडळांमार्फत तातडीने करून घेण्याबाबत आपल्या कार्यक्षेतील सर्व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी तसेच सर्व संबंधित घटकांना लिखित स्वरूपात अवगत करून देण्याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी आणि संबंधित अहवाल राज्य मंडळास सादर करावा, असे देखील डॉ. माळी यांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Apr 01, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

# Maha school edu dept plans to hike FYJC quota for girls to 50%

## Idea Is To Incentivise Education, Says Official

Yogita.Rao@timesofindia.com

**Mumbai:** In the coming academic year, first-year junior college (FYJC) classrooms across the state may see a 50-50 allocation, with girls taking up half the seats. The Maharashtra school education department is considering a proposal to increase their existing quota in FYJC from 30% to 50% to improve access for girl students and encourage continuation in education early on.

In another significant change likely in the upcoming admission process, the in-house quota in junior colleges may no longer be capped at 10%. Students from schools attached to junior colleges would be given first preference in admissions, enabling a smoother progression, like in the case in CBSE and ISC schools.

Both the proposals are currently under consideration at minister Dada Bhuse's office, and a govt resolution (GR) is expected to be issued soon.

A govt official said there have been demands from the parents in the past seeking a 50% reservation for girls in FYJC. "When women get 50% representation in local self-govt bodies, why shouldn't they be given equal representation in educational institutions? If they comprise half the population, then it is only fair to encourage them to pursue education at a higher level. In many good colleges, they probably make up for more than half the total numbers of students already. The idea is to incentivise higher secondary education for them," said an official. The proposal has been under consideration for some time and a final decision is expected soon. "Girls already make up for over 50% students in some urban colleges as they outperform boys. This will probably help students from the rural areas," said a Mumbai college principal whose FYJC batches have more than 60% girls. Another principal said some junior colleges which offer integrated coaching for IIT admissions may see an impact too.

An official said the policy will ensure girls do not drop out for not getting a seat in college closer to their homes. "We wish to make higher secondary education as accessible as possible for them," he said. Last year, of the total 13.49 lakh students admitted to junior colleges in state in the online process, 48% were girls.

For in-house quota, natural progression may be allowed to students. "Students from schools attached to junior colleges or run by the same management may directly take admission in the 'zero round', regardless of cutoffs. It will be an additional option for them. The department plans to not restrict it at 10%. For this, colleges and schools run by the same managements can be in the same building, same complex or even the same district. For institutions in Mumbai, this could extend to Mumbai Metropolitan Region," said the official.

A college principal said this could impact top colleges where the management also runs schools. "It may reduce seats available for meritorious students from outside."

### 10% IN-HOUSE QUOTA CAP MAY GO

**2025-26 FYJC admissions**

Total students admitted through online process | **13.5L**

Girls 6.5L

Boys 7L

Total seats available **22L**



**Total quotas currently in place for FYJC admissions**

**Minority colleges** | **35%** for open category, **50%** minority, **10%** in-house, **5%** management

**Non-minority colleges** | **38%** for open category, **10%** in-house, **5%** management plus constitutional and social reservations

➤ Currently, women's reservation of **30%** is applied horizontally

The Times of India 1.4.2026

## *News Paper Clippings During April 2026*

### *Section: Education*

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# शिष्यवृत्तीसाठी आता 'आधार' अनिवार्य

## यूजीसीचा निर्णय; थेट बँक खात्यात जमा होणार रक्कम

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ६ -** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शिष्यवृत्ती आणि फेलोशिप वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि निधी वितरणाचा वेग वाढवण्यासाठी 'आधार-आधारित पेमेंट प्रणाली' अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणाऱ्या या निर्णयामुळे आता शिष्यवृत्तीची रक्कम कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट विद्यार्थ्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यात 'थेट लाभ हस्तांतरणा'द्वारे (डीबीटी) जमा होणार आहे.

शिष्यवृत्ती आता केवळ त्याच खात्यात जमा होईल, जे खाते आधार क्रमांकाशी जोडलेले असेल. ही संपूर्ण प्रक्रिया 'स्कॉलरशिप अँड फेलोशिप मॅनेजमेंट पोर्टल' मार्फत राबवली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी आपले बँक खाते आधारशी लिंक करीत तातडीने ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. ही माहिती पोर्टलवर अद्ययावत करण्यासाठी आयोगाने १५ एप्रिल २०२६ पर्यंतची मुदत दिली आहे.

Pune City Edition
Apr 07, 2026 Page No. 15
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2026*

### *Section: Education*

# पदवीच्या चौथ्या वर्षाबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत राज्यात शैक्षणिक वर्ष २०२६इ२७ पासून चार वर्षांची ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) पदवी अभ्यासक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केल्या आहेत.
त्यानुसार, तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच, पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता असलेल्या महाविद्यालयांना थेट चौथ्या वर्षाचा ऑनर्स अभ्यासक्रम, तर पदव्युत्तरसह पीएचडी संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) अभ्यासक्रम थेट सुरू करता येणार आहे.
राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नुसार पदवी अभ्यासक्रमात ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स या चौथ्या वर्षाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या चौथ्या वर्षाबाबत आतापर्यंत मार्गदर्शक सूचनाच नसल्याने महाविद्यालयांच्या स्तरावर संभ्रमाची स्थिती होती. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने चौथ्या वर्षाच्या ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयाद्वारे जाहीर केल्या आहेत.
बिगरव्यावसायिक (नॉन एआयसीटीई) अभ्यासक्रमात चौथ्या वर्षासाठी *(पान १२ वर)*

**पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता असलेल्या महाविद्यालयांना ऑनर्स अभ्यासक्रम, तर पदव्युत्तरसह पीएचडी संशोधन केंद्र असलेल्यांना संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रम थेट सुरू करता येईल.**

### 'अभियांत्रिकी'मध्ये तीन पर्याय



अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी मुख्य विषय, दुय्यम विषयाची संकल्पना आणण्यात आली आहे. तसेच, त्यासाठी तीन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यानुसार 'बीई', बी. टेक पदवीमध्ये एक मुख्य विषय, एक बहुविद्याशाखीय दुय्यम विषय, दुसऱ्या पर्यायात एक मुख्य विषय, दुहेरी दुय्यम विषय, तर ऑनर्स पदवीसह बहुविद्याशाखीय दुय्यम विषय असा तिसरा पर्याय असणार आहे.

epaper.loksatta.com

# पदवीच्या चौथ्या वर्षाबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर

*(पान १ वरून)*

चार वर्षांची ऑनर्स पदवी, संशोधनासह ऑनर्स हे दोन प्रमुख पर्याय उपलब्ध होणार आहेत. ऑनर्स आणि संशोधनासह पदवी या दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये मुख्य विषय, बहुविद्याशाखीय दुय्यम विषय, मुक्त निवड विषय, व्यावसायिक व कौशल्यवर्धन अभ्यासक्रम, क्षमता वर्धन अभ्यासक्रम, मूल्यशिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली, सहशैक्षणिक अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग, क्षेत्रीय प्रकल्प, लोकसहभाग प्रकल्प या घटकांचा समावेश असेल.

ऑनर्स अभ्यासक्रमाच्या चार वर्षांत एकूण १६०- १७६ श्रेयांक पूर्ण करणाऱ्या, चार श्रेयांकांचे कार्यप्रशिक्षण (इंटर्नशिप) पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पदवी प्रदान केली जाईल. तर, संशोधनासह पदवी अभ्यासक्रमासाठी चौथ्या वर्षाच्या मुख्य विषयात १२ श्रेयांकांचा संशोधन प्रकल्प, प्रबंध पूर्ण करणे आवश्यक ठरणार आहे. संबंधित १२ श्रेयांकांची सातव्या, आठव्या सत्रातील विभागणीचा निर्णय संबंधित विद्यापीठ, स्वायत्त महाविद्यालयाने घ्यायचा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्यापीठांच्या विभागांना चौथे वर्ष थेट सुरू करता येणार आहे. संलग्न-स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना लॅटरल एंट्रीद्वारे प्रवेश दिला जाईल. चौथ्या वर्षाची परीक्षा सत्रनिहाय सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, सत्र परीक्षेद्वारे घेतली जाईल. या दोन्हींचे प्रमाण विद्यापीठाकडून ठरवण्यात येईल. लॅटरल एंट्रीद्वारे विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालय किंवा विद्यापीठ विभागात चौथ्या वर्षात प्रवेश घेता येईल. मात्र, विद्यार्थ्यांच्या आधीच्या कामगिरीची पडताळणी करून, तसेच श्रेयांक हस्तांतरण, राज्य शासनाच्या आरक्षण धोरणानुसार प्रवेश दिला जाईल. यूजीसी नियम २०२१ नुसार एका सत्रातील एकूण अभ्यासक्रमापैकी ४० टक्के अभ्यासक्रम स्वयम संकेतस्थळाद्वारे ऑनलाइन शिकवता येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

पदव्युत्तर, पीएचडी केंद्र नसलेल्या महाविद्यालयात चौथे वर्ष सुरू करण्यासाठीचे पात्रता निकष विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येतील. त्यात ऑनर्स अभ्यासक्रमासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मान्यताप्राप्त प्राध्यापक, नॅक दर्जा, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, पीएचडी मार्गदर्शक, गेल्या पाच वर्षांतील संशोधन, संशोधन प्रयोगशाळा, उपकरणे, ग्रंथालय, सॉफ्टवेअर, संशोधन संस्था किंवा उद्योग संस्थांशी सहकार्य या घटकांचा समावेश असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

Loksatta 7.4.2026

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

लोकमत

# 'त्या' महाविद्यालयांना चौथ्या वर्षाची मुभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे तसेच पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता असलेल्या महाविद्यालयांना थेट चौथ्या वर्षाचा ऑनर्स अभ्यासक्रम आणि पदव्युत्तरसह पीएच.डी. संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रम थेट सुरू करता येईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिली आहे.

चौथ्या वर्षाची प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने सरकारी विद्यापीठांसह खासगी आणि स्वायत्त महाविद्यालये आणि विद्यापीठांना स्पष्टता नव्हती. त्यावर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना जाहीर करावे, अशी मागणी होत होती.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पदवी अभ्यासक्रमात ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स या चौथ्या वर्षाची तरतूद आहे. मात्र, याबाबत मार्गदर्शक सूचनाच नसल्याने महाविद्यालयांच्या स्तरावर संभ्रमाची स्थिती आहे.

Hello Pune
Page No. 2 Apr 07, 2026
Powered by: erelego.com

NEP 2020

# State govt releases guidelines for four-year undergraduate courses: All you need to know

## Colleges offering three-year courses will need approval

Soham Shah
*Pune, April 6*

THE MAHARASHTRA Higher and Technical Education Department on Monday released the long-awaited guidelines for implementation of the four-year programme in undergraduate courses in the state. The National Education Policy (NEP) 2020 made provisions for four-year undergraduate degrees. The Maharashtra State Academic and Research Council (MahaSARC) committee of Vice Chancellors of top universities in the state was tasked with forming the guidelines that have now been released.

### *Guidelines for non-technical courses*

The 4-year Non-AICTE non-professional UG programme has been structured into eight semesters and offers two pathways: 4-Year UG Degree with Honours and 4-Year UG Degree Honours with Research.

For the UG (Honours with Research) degree, students will be required to complete a research project or a dissertation for 12 credits in the fourth year in the major subject.

### *Which colleges will be able to offer 4th year?*

The guidelines specify that the fourth year of the four-year UG programme will not be granted to any college as 'natural growth'.

Colleges currently offering only three-year UG courses will have to seek approval to commence a fourth year programme.

The fourth year of the UG Honours programme will be identical to the first year of a two year PG programme offered after a three-year UG programme. Colleges already having permission and recognition for a postgraduate course in the same major will be automatically allowed to conduct the fourth year UG Honours Degree. Colleges with an approved PG programme and a PhD Research Centre will be allowed to offer a fourth year of UG Honours with Research Degree.

### *Eligibility for 4th year programme*

- For admission to the fourth year of UG (Honours) degree, students must have successfully earned the required credits, typically around 120-132 credits, by the end of their third year.
- For admission to fourth year UG (Honours with Research Program), students must typically obtain a specific CGPA of 7.5 and complete 120-132 credits.
- The sanctioned class strength for the UG (Honours with Research Program) fourth year will be equal to five times the number of recognised PhD guides.
- Students can also seek lateral entry to fourth year at a different college or university where approval is already granted subject to conditions laid down by the university.

### *Approval to colleges for 4th year*

Universities will need to evolve mechanisms for approval of the fourth year in colleges that do not have a PG programme or a PhD research centre in the concerned major subjects.

- UG (Honours) - Only colleges that have necessary infrastructure and approved faculty for the concerned subject at the 400-level (Level 6.0) will be eligible to offer the fourth year.
- UG (Honours with Research) Universities must come up with guidelines for approval which can include: minimum number of approved PhD guides, evidence of active research published in Indexed Journal lists of SciFinder, Web of Science and Scopus and/or ongoing or completed funded Research Projects, Dedicated Research Laboratories, plagiarism detection software, high-speed internet, software, tie-ups with recognised institutes, etc.

### *Engineering courses*

- The guidelines define three pathways for AICTE-governed professional engineering UG programmes: B.E or B.Tech with Single Major and Single Multidisciplinary Minor.
- Single Major and Double Minor (MDM and Emerging Specialization Minor) and Honours B Tech/ B E Degree Program, Single Multidisciplinary Minor.

The Indian Express 7.4.2026

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

पुढारी

# पदव्युत्तर, पीएच. डी. केंद्र नसलेल्या महाविद्यालयांसाठी स्वतंत्र निकष

- **संबंधित महाविद्यालयांना विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना मिळणार**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत राज्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांची ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रिसर्च) पदवी अभ्यासक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केल्या आहेत. त्यानुसार पदव्युत्तर, पीएच.डी. केंद्र नसलेल्या महाविद्यालयांसाठी स्वतंत्र निकष ठरविण्यात येणार असून, त्यांच्यासाठी विद्यापीठाकडून वेगळ्या मार्गदर्शक सूचना देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष कोणत्याही महाविद्यालयाला 'स्वाभाविक वाढ' नाही. तसेच तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी स्वतंत्र परवानगी आवश्यक असणार आहे. पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांना चौथ्या वर्षाचा ऑनर्स अभ्यासक्रम थेट सुरू करण्यास, तसेच पदव्युत्तर, पीएच.डी. संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना थेट संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी देण्यात येणार आहे.

केवळ तीन वर्षांचा अभ्यासक्रम चालवणाऱ्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून इतर महाविद्यालयांमध्ये चौथ्या वर्षात प्रवेशासाठीची व्यवस्था करण्यात येणार आहे. ऑनर्स पदवीचे चौथे वर्ष हे तीन वर्षांच्या पदवीनंतरच्या दोन वर्षांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षास समतुल्य करण्यात येणार आहे. पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षात पहिल्या सत्रात संशोधन पद्धती, दुसऱ्या सत्रात ४ श्रेयांकांचे कार्यप्रशिक्षण, दुसऱ्या वर्षात तिसरे आणि चौथे सत्र मिळून १०ङ्ग१२ श्रेयांकांचा संशोधन प्रकल्प करणे आवश्यक करण्यात येणार आहे. ऑनर्स अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी पहिल्या तीन वर्षांत १२०ङ्ग१३२ श्रेयांक पूर्ण करणे, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी १२०ङ्ग १३२ पूर्ण करून किमान ७.५ सीजीपीए असणे गरजेचे आहे. प्रवेशांसाठी महाविद्यालयात मान्यताप्राप्त पीएच.डी. प्राध्यापक असणे गरजेचे आहे. तसेच, श्रेयांक हस्तांतरण, मल्टिपल एन्ट्री-मल्टिपल एक्झिटसाठी सर्व विद्यार्थ्यांनी अ‍ॅकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटवर नोंदणी करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

Pune Edition
Apr 08, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During April 2026*

### *Section: Education*

# पदवीच्या चौथ्या वर्षाबाबत अनेक प्रश्न

## महाविद्यालयांच्या स्तरावर संभ्रमाची स्थिती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाबाबतच्या (ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स) मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केल्या आहेत. मात्र, या मार्गदर्शक सूचनांमध्ये शैक्षणिक स्पष्टता देण्यात आली असली, तरी तुकडी किती विद्यार्थ्यांची असावी, चौथ्या वर्षासाठी शासनाची शिष्यवृत्ती मिळणार की नाही, असे नवे व्यावहारिक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे महाविद्यालयांच्या स्तरावर संभ्रमाचीच स्थिती असल्याचे चित्र आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०नुसार पदवी अभ्यासक्रमात ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स या चौथ्या वर्षाची तरतूद करण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच, पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता असलेल्या महाविद्यालयांना थेट चौथ्या वर्षाचा ऑनर्स अभ्यासक्रम, तर पदव्युत्तरसह पीएचडी संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) अभ्यासक्रम थेट सुरू करता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच विषय रचना, श्रेयांक, सीजीपीए, कार्यप्रशिक्षण, संशोधन प्रकल्प या बाबतची माहिती देण्यात आली आहे. मात्र, महाविद्यालयांमध्ये अजूनही संभ्रम कायम आहे. आतापर्यंत पारंपरिक अभ्यासक्रमांच्या तीन वर्षासाठीच शासनाकडून शिष्यवृत्ती मिळत होती. आता चौथे वर्ष लागू करताना विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार की नाही, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश (पान ४ वर)




पदवीच्या चौथ्या वर्षाच्या किती विद्यार्थ्यांची तुकडी असावी, नव्याने मान्यता घेणाऱ्या महाविद्यालयांत चौथ्या वर्षाचे शुल्क किती असावे, चौथ्या वर्षाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार की नाही, अशा विविध मुद्द्यांवर शासनाकडून स्पष्टता येणे गरजेचे आहे.

– **डॉ. नितीन करमळकर**, माजी कुलगुरु

### चौथ्या वर्षाबाबत व्यापक जागृतीची गरज

महाविद्यालय स्तरावर केलेल्या सर्वेक्षणात चौथ्या वर्षासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे दिसून आले. अनेक विद्यार्थ्यांना पदवीचे चौथे वर्ष असल्याची माहिती नाही, असेही आढळले. त्यामुळे चौथ्या वर्षाबाबत व्यापक जागृतीची गरज असल्याचेही डॉ. मोहरील यांनी नमूद केले.

---

**४ | बुधवार, ८ एप्रिल २०२६**

### पदवीच्या चौथ्या वर्षाबाबत अनेक प्रश्न

*(पान १ वरून)*

मोहरील यांनी चौथ्या वर्षाच्या अंमलबजावणीबाबत व्यावहारिक स्तरावर संभ्रम असल्याचे नमूद केले. 'पदवीच्या चौथ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी किमान घड्याळी तासिका तत्त्वावर (सीएचबी) शिक्षक नियुक्ती केली जाणार की नाही, अभ्यासक्रमांचे मॅपिंग करताना स्पेशलायझेशन करायचे, की नाही, तुकडीसाठी विद्यार्थिसंख्या किती हवी, कमी विद्यार्थी असल्यास तुकडी ठेवता येणार की नाही असे अनेक प्रश्न आहेत. चौथ्या वर्षानंतर पदव्युत्तर पदवीला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनुषंगानेही स्वतंत्र मार्गदर्शक सूचना असण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७हे चौथ्या वर्षाचे पहिले वर्ष आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी पाहता पहिल्या वर्षी विद्यार्थिसंख्येबाबत सवलत असावी, एक ऑक्टोबर २०२६पर्यंत चौथ्या वर्षाच्या प्रवेशांचे चित्र स्पष्ट होईल. त्यानुसार पुढील वर्षीबाबत स्वतंत्रपणे विचार करावा लागेल, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

Loksatta 8.4.2026

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

# पदव्युत्तर, पीएच.डी. केंद्र असलेल्या महाविद्यालयांना चौथ्या वर्षाची मुभा

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचना जाहीर

**पुणे** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत राज्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांची ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) पदवी अभ्यासक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केल्या आहेत. त्यानुसार तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता असलेल्या महाविद्यालयांना थेट चौथ्या वर्षाचा ऑनर्स अभ्यासक्रम, तर पदव्युत्तरसह पीएच डी संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) अभ्यासक्रम थेट सुरू करता येणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पदवी अभ्यासक्रमात ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स या चौथ्या वर्षाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या चौथ्या वर्षाबाबत आतापर्यंत मार्गदर्शक सूचनाच नसल्याने महाविद्यालयांच्या स्तरावर संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने चौथ्या वर्षाच्या ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयाद्वारे जाहीर केल्या आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चौथ्या वर्षाचा ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

बिगरव्यावसायिक (नॉन एआयसीटीई) अभ्यासक्रमात चौथ्या वर्षासाठी चार वर्षांची ऑनर्स पदवी, संशोधनासह ऑनर्स हे दोन प्रमुख पर्याय उपलब्ध होणार आहेत. ऑनर्स आणि संशोधनासह पदवी या दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये मुख्य विषय, बहुविद्याशाखीय दुय्यम विषय, मुक्त निवड विषय, व्यावसायिक व कौशल्यवर्धन अभ्यासक्रम, क्षमता वर्धन अभ्यासक्रम, मूल्यशिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली, सहशैक्षणिक अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग, क्षेत्रीय प्रकल्प, लोकसहभाग प्रकल्प या घटकांचा समावेश असेल. ऑनर्स अभ्यासक्रमाच्या चार वर्षांत एकूण १६०-१७६ श्रेयांक पूर्ण करणाऱ्या, चार श्रेयांकाचे कार्यप्रशिक्षण (इंटर्नशीप) पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पदवी प्रदान केली जाईल. तर संशोधनासह पदवी अभ्यासक्रमासाठी चौथ्या वर्षाच्या मुख्य विषयात १२ श्रेयांकांचा संशोधन प्रकल्प, प्रबंध पूर्ण करणे आवश्यक ठरणार आहे. संबंधित १२ श्रेयांकांची सातव्या, आठव्या सत्रातील विभागणीचा निर्णय संबंधित विद्यापीठ, स्वायत्त महाविद्यालयाने घ्यायचा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पदव्युत्तर, पी एचडी केंद्र नसलेल्या महाविद्यालयात चौथे वर्ष सुरू करण्यासाठीचे पात्रता निकष विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येतील. त्यात ऑनर्स अभ्यासक्रमासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मान्यताप्राप्त प्राध्यापक, नॅक दर्जा, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, पीएचडी मार्गदर्शक, गेल्या पाच वर्षांतील संशोधन, संशोधन प्रयोगशाळा, उपकरणे, ग्रंथालय, सॉफ्टवेअर, संशोधन संस्था किंवा उद्योग संस्थांशी सहकार्य या घटकांचा समावेश असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

Kesari 8.4.2026

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

# ऑनर्स; संशोधनासह ऑनर्स राज्यात २०२६-२७ पासून

## चार वर्षांच्या अभ्यासक्रमातील चौथ्या वर्षासाठी सूचना जाहीर

हर्ष दुधे

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'च्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातल्या चौथ्या वर्षाबाबत 'उच्च व तंत्रशिक्षण' विभागानं सविस्तर मार्गदर्शक सूचना सोमवारी जाहीर केल्या. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून 'ऑनर्स' आणि 'संशोधनासह ऑनर्स' (ऑनर्स विथ रिसर्च) हे पर्याय लागू करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे गेल्या काही वर्षांपासून चौथ्या वर्षाच्या अंमलबजावणीबाबत असलेला संभ्रम दूर झाला आहे. राज्यातल्या सर्व विद्यापीठांसह संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये या अभ्यासक्रमाची एकसमान अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला आहे.

नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार चौथे वर्ष कोणत्याही महाविद्यालयाला 'स्वाभाविक वाढ' म्हणून लागू होणार नाही. तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी विद्यापीठाची स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे. मात्र, पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांना थेट ऑनर्स अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. तर पदव्युत्तर व पीएचडी संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रम थेट सुरू करण्याची मुभा देण्यात आली आहे.

### अभ्यास व संशोधन प्रकल्प

चौथ्या वर्षासाठी विद्यार्थ्यांना दोन पर्याय उपलब्ध असतील. ऑनर्स पदवीमध्ये विषयाचा सखोल अभ्यास, तर संशोधनासह ऑनर्समध्ये संशोधन प्रकल्पावर भर असेल. ऑनर्स पदवीसाठी चार वर्षांत १६० ते १७६ श्रेयांक पूर्ण करणं आणि कार्यप्रशिक्षण (इंटर्नशीप) आवश्यक असेल. संशोधनासह ऑनर्ससाठी चौथ्या वर्षात १२ श्रेयांकांचा प्रबंध पूर्ण करणं बंधनकारक राहील.




### संशोधनासाठी अट

चौथ्या वर्षात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी पहिल्या तीन वर्षांत १२० ते १३२ श्रेयांक पूर्ण केलेले असणं आवश्यक आहे. संशोधनासह ऑनर्ससाठी किमान ७.५ 'सीजीपीए'ची अट ठेवण्यात आली आहे. प्रवेश क्षमता संबंधित विषयातील मान्यताप्राप्त पीएचडी मार्गदर्शकांच्या संख्येनुसार (मार्गदर्शक × ५) निश्चित केली जाणार आहे.

### चौथे वर्ष थेट

राज्यातील विद्यापीठ विभागांना चौथे वर्ष थेट सुरू करता येणार असून, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना 'लॅटरल एंट्री'द्वारे इतर महाविद्यालय किंवा विद्यापीठ विभागात प्रवेश घेण्याची संधी मिळणार आहे. मात्र, प्रवेश देताना विद्यार्थ्यांच्या आधीच्या शैक्षणिक कामगिरीची पडताळणी, श्रेयांक हस्तांतरण आणि शासनाच्या आरक्षण धोरणाचं पालन करणं आवश्यक राहील.

### चाळीस टक्के ऑनलाइन

परीक्षा पद्धती सत्रनिहाय असणार असून; सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन आणि सत्रअखेर परीक्षा यांचा समावेश असेल. अभ्यासक्रमातला ४० टक्क्यांपर्यंत भाग ऑनलाइन पद्धतीनं शिकवण्यास परवानगी देण्यात आली आहे. 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'मध्ये नोंदणी अनिवार्य करून मल्टिपल एंट्री-एक्झिट प्रणाली लागू करण्यात येणार आहे.

### विद्यापीठ ठरवणार निकष

महाविद्यालयांकडे पदव्युत्तर किंवा संशोधन सुविधा नसतील, तर त्यांच्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, प्राध्यापकांची उपलब्धता, नॅक दर्जा, संशोधन कार्य, प्रयोगशाळा, ग्रंथालय, उद्योग-संस्थांशी सहकार्य आदी निकष विद्यापीठांकडून निश्चित केले जाणार आहेत. या नव्या धोरणामुळे पदवी शिक्षण अधिक लवचिक, कौशल्याधारित आणि संशोधनाभिमुख होणार असून, पदवी ते पदव्युत्तर शिक्षणाचा दुवा अधिक मजबूत होणार असल्याचं शिक्षण क्षेत्रातून सांगितलं जात आहे.

Harsh.Dudhe@timesofindia.com

### ठळक मार्गदर्शक सूचना

- चौथं वर्ष 'स्वाभाविक वाढ' नाही; स्वतंत्र परवानगी आवश्यक.
- तीन वर्षांचा अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांना विद्यापीठाची मंजुरी बंधनकारक.
- पदव्युत्तर महाविद्यालयांना ऑनर्स, तर पीएचडी केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स सुरू करण्याची मुभा.
- ऑनर्स पदवीचं चौथं वर्ष पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षास समतुल्य.
- इतर महाविद्यालयांत 'लेटरल एंट्री'ची सुविधा.
- श्रेयांक हस्तांतरणासाठी 'अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट' अनिवार्य.

### अभ्यासक्रमाची वैशिष्ट्यं

- दोन पर्याय : ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स.
- ऑनर्ससाठी १६०-१७६ श्रेयांक व इंटर्नशीप आवश्यक.
- संशोधनासह ऑनर्ससाठी १२ श्रेयांकांचा प्रबंध अनिवार्य.
- प्रवेशासाठी १२०-१३२ श्रेयांक; संशोधनासाठी किमान ७.५ सीजीपीए.
- प्रवेश क्षमता : पीएचडी मार्गदर्शक संख्या × ५
- ४०% अभ्यासक्रम ऑनलाइन शिकण्यास परवानगी.
- सत्रपद्धतीनुसार परीक्षा (अंतर्गत + सत्रअखेर)

### महाविद्यालयांसाठी पात्रता निकष

- ऑनर्ससाठी आवश्यक पायाभूत सुविधा व मान्यताप्राप्त प्राध्यापक.
- नॅक दर्जा आणि शैक्षणिक गुणवत्ता निकष.
- संशोधनासह ऑनर्ससाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम अनिवार्य.
- पीएचडी मार्गदर्शक, संशोधन प्रकल्प व प्रकाशने आवश्यक.
- संशोधन प्रयोगशाळा, ग्रंथालय, डिजिटल साधने व सॉफ्टवेअर.
- उद्योग व संशोधन संस्थांशी सहकार्य.

Maharashtra Times 8.4.2026

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

# चौथ्या वर्षी ऑनर्स अभ्यासक्रम राबविता येणार

## महाविद्यालयांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचना जाहीर

**पुणे, ता. ७ :** तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार चौथे वर्ष सुरू करण्यासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे. पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता असलेल्या महाविद्यालयांना थेट चौथ्या वर्षाचा ऑनर्स अभ्यासक्रम, तर पदव्युत्तरसह पीएच.डी. संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रिसर्च) अभ्यासक्रम थेट सुरू करता येणार आहे.

राज्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांची ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) पदवी अभ्यासक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केल्या. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चौथ्या वर्षाचा ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमात चौथ्या वर्षासाठी चार वर्षांची ऑनर्स पदवी, संशोधनासह ऑनर्स हे दोन प्रमुख पर्याय उपलब्ध होणार आहेत. ऑनर्स आणि संशोधनासह पदवी या दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये मुख्य विषय, बहुविद्याशाखीय दुय्यम विषय, मुक्त निवड विषय, व्यावसायिक व कौशल्यवर्धन अभ्यासक्रम, क्षमता वर्धन अभ्यासक्रम, मूल्यशिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली, सहशैक्षणिक अभ्यासक्रम, क्षेत्रीय प्रकल्प, लोकसहभाग प्रकल्प या घटकांचा समावेश असेल. ऑनर्स अभ्यासक्रमाच्या चार वर्षांत एकूण १६०–१७६ श्रेयांक पूर्ण करणाऱ्या, चार श्रेयांकांचे कार्यप्रशिक्षण (इंटर्नशिप)) पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवीप्रदान केली जाईल. संशोधनासह पदवी अभ्यासक्रमासाठी चौथ्या वर्षाच्या मुख्य विषयात १२ श्रेयांकांचा संशोधन प्रकल्प, प्रबंध पूर्ण करणे आवश्यक ठरणार आहे. १२ श्रेयांकांची सातव्या, आठव्या सत्रातील विभागणीचा निर्णय संबंधित विद्यापीठ, स्वायत्त महाविद्यालयाने घ्यायचा आहे.

विद्यापीठांच्या विभागांना चौथे वर्ष थेट सुरू करता येणार आहे. संलग्न-स्वायत्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना लॅटरल एंट्रीद्वारे प्रवेश दिला जाईल. चौथ्या वर्षाची परीक्षा सत्रनिहाय सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, सत्र परीक्षेद्वारे घेतली जाईल. लॅटरल एंट्रीद्वारे विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालय किंवा विद्यापीठ विभागात चौथ्या वर्षात प्रवेश घेता येईल.

पदव्युत्तर, पीएच.डी. केंद्र नसलेल्या महाविद्यालयात चौथे वर्ष सुरू करण्यासाठीचे पात्रता निकष विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येतील. त्यात ऑनर्स अभ्यासक्रमासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मान्यताप्राप्त प्राध्यापक, नॅक दर्जा, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम असणे, पीएच.डी. मार्गदर्शक, गेल्या पाच वर्षांतील संशोधन, संशोधन प्रयोगशाळा, उपकरणे, ग्रंथालय, सॉफ्टवेअर, संशोधन संस्था किंवा उद्योग संस्थांशी सहकार्य या घटकांचा समावेश असेल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

> हा निर्णय विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची व्याप्ती वाढवणारा आणि त्यांना संशोधनासाठी सक्षम करणारा आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कटिबद्ध आहे.
> - **डॉ. पराग काळकर**, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Sakal 8.4.2026

## *News Paper Clippings During April 2026*

### *Section: Education*

प्रभात

# चौथ्या वर्षाचा घाट, पण सुविधांची अग्निपरीक्षा?

## चौथे वर्ष पदवीची अंमलबजावणी कागदावरच राहण्याचे संकेत

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ८ - उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अखेर पदवीच्या चौथ्या वर्षाबाबतची नियमावली जाहीर केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स असे दोन पर्याय विद्यार्थ्यांसमोर असतील. मात्र, हे चौथे वर्ष म्हणजे केवळ कागदोपत्री बदल नसून, महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांची अग्निपरीक्षा ठरणार आहे. पदवीचा विस्तार करताना ग्रामीण भागातील महाविद्यालयांची दूरवस्था आणि प्राध्यापकांच्या रिक्त जागांच्या वास्तवाकडे सरकारने दुर्लक्ष केले आहे. यामुळे या महत्त्वाकांक्षी धोरणाच्या यशावरच आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.**



नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार पदवी अभ्यासक्रमात ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स या चौथ्या वर्षाची तरतूद आहे. मात्र, या चौथ्या वर्षाबाबत आतापर्यंत मार्गदर्शक सूचनाच नव्हती. आता उच्च व तंत्रशिक्षण विभागाने चौथ्या वर्षाच्या ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शासकीय निर्णयानुसार ज्या महाविद्यालयांकडे पीएचडी केंद्र नाही, त्यांना चौथ्या वर्षासाठी कडक निकष लावले जाणार आहेत. मात्र, वास्तव हे आहे, की राज्यातील ६० टक्क्यांहून अधिक महाविद्यालयांकडे स्वतःच्या सुसज्ज प्रयोगशाळा किंवा अद्ययावत ग्रंथालयही नाही. अशा परिस्थितीत संशोधनासह ऑनर्स ही संकल्पना केवळ ठराविक नामांकित संस्थांपुरतीच मर्यादित राहण्याची भीती आहे. एकीकडे प्राध्यापकांच्या हजारो जागा रिक्त आहेत, तर दुसरीकडे ४० टक्के अभ्यासक्रम स्वयम पोर्टलवरून ऑनलाइन शिकवण्याचा सल्ला दिला आहे. ज्या भागात आजही वीज आणि इंटरनेटची शाश्वती नाही, तिथे विद्यार्थी ऑनलाइन क्रेडिट्स कसे मिळवणार? याशिवाय उत्तीर्णतेची ७५ टक्क्यांची अट लावून संशोधनाचे दरवाजे बहुसंख्य विद्यार्थ्यांसाठी बंद केल्याची भावनाही आहे.

### विद्यापीठांवर ढकलली जबाबदारी

चौथ्या वर्षासाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ, पायाभूत सुविधांसाठी लागणारा निधी आणि परीक्षांचे नियोजन यावर शासन निर्णयात मौन बाळगले आहे. कोणत्याही महाविद्यालयाला हे वर्ष स्वाभाविक वाढ म्हणून मिळणार नाही, असे म्हणून सरकारने आपली जबाबदारी झटकली आहे. पदवीचे चौथे वर्ष हे पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षास समतुल्य मानल्यामुळे भविष्यात पदव्युत्तर महाविद्यालयांचे अस्तित्व धोक्यात येईल आणि पर्यायाने शिक्षणाचे खासगीकरण वाढेल, असा सूर तज्ज्ञांनी आळवला आहे.

Pune City Edition
Apr 09, 2026 Page No. 15
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी परवानगी बंधनकारक

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचना | राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार तरतूद

**। पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत राज्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांची ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) पदवी अभ्यासक्रमासाठीच्या मार्गदर्शक सूचना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केल्या आहेत. त्यानुसार तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम चालवणाऱ्या संलग्न महाविद्यालयांना चौथे वर्ष सुरू करण्यासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच पदवीसह पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता असलेल्या महाविद्यालयांना थेट चौथ्या वर्षाचा ऑनर्स अभ्यासक्रम, तर पदव्युत्तरसह पीएच.डी. संशोधन केंद्र असलेल्या महाविद्यालयांना संशोधनासह ऑनर्स (ऑनर्स विथ रीसर्च) अभ्यासक्रम थेट सुरू करता येणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पदवी अभ्यासक्रमात ऑनर्स आणि संशोधनासह ऑनर्स या चौथ्या वर्षाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या चौथ्या वर्षाबाबत आतापर्यंत मार्गदर्शक सूचनाच नसल्याने महाविद्यालयांच्या स्तरावर संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने चौथ्या वर्षाच्या ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णयाद्वारे जाहीर केल्या आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चौथ्या वर्षाचा ऑनर्स, संशोधनासह ऑनर्स अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे.

बिगरव्यावसायिक (नॉन एआयसीटीई) अभ्यासक्रमात चौथ्या वर्षासाठी चार वर्षांची ऑनर्स पदवी, संशोधनासह ऑनर्स हे दोन प्रमुख पर्याय उपलब्ध होणार आहेत.

ऑनर्स आणि संशोधनासह पदवी या दोन्ही अभ्यासक्रमांमध्ये मुख्य विषय, बहुविद्याशाखीय दुय्यम विषय, मुक्त निवड विषय, व्यावसायिक व कौशल्यवर्धन अभ्यासक्रम, क्षमता वर्धन अभ्यासक्रम, मूल्यशिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली, सहशैक्षणिक अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग, क्षेत्रीय प्रकल्प, लोकसहभाग प्रकल्प या घटकांचा समावेश असेल. ऑनर्स अभ्यासक्रमाच्या चार वर्षांत एकूण १६०-१७६ श्रेयांक पूर्ण करणाऱ्या, चार श्रेयांकांचे कार्यप्रशिक्षण (इंटर्नशीप) पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पदवी प्रदान केली जाईल. तर संशोधनासह पदवी अभ्यासक्रमासाठी चौथ्या वर्षाच्या मुख्य विषयात १२ श्रेयांकांचा संशोधन प्रकल्प, प्रबंध पूर्ण करणे आवश्यक ठरणार आहे. संबंधित १२ श्रेयांकांची सातव्या, आठव्या सत्रातील विभागणीचा निर्णय संबंधित विद्यापीठ, स्वायत्त महाविद्यालयाने घ्यायचा असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Apr 09, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

लोकमत

# राज्यातील विद्यापीठांत ऑनर्स, ऑनर्स विथ रिसर्च अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीबाबत राज्यातील उच्च शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. यानुसार राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून 'ऑनर्स' तसेच 'ऑनर्स विथ रिसर्च' हे अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती दिली.

याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. त्यानुसार सदर अभ्यासक्रमाची सुसूत्र, प्रभावी व एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. यात नवीन शैक्षणिक संरचनेनुसार विद्यार्थ्यांना दोन पर्याय उपलब्ध राहतील. चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम (ऑनर्स) पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना १६० ते १७६ क्रेडिट्स पूर्ण केल्यानंतर ऑनर्स पदवी प्रदान करण्यात येईल. चौथ्या वर्षात इंटर्नशीप अनिवार्य राहील. तसेच 'ऑनर्स विथ रिसर्च' या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या मुख्य विषयात १२ क्रेडिट्सचा संशोधन प्रकल्प किंवा प्रबंध सादर करणे आवश्यक असेल.

> "राज्यातील उच्च शिक्षण अधिक कौशल्याधारित, संशोधनाभिमुख व जागतिक स्तरावरील मानकांशी सुसंगत होण्यास चालना मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होऊन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.
>
> **चंद्रकांत पाटील,** मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी पहिल्या तीन वर्षात आवश्यक (सुमारे १२० ते १३२) क्रेडिट्स पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे. 'ऑनर्स विथ रिसर्च'साठी किमान ७.५ सीजीपीए आवश्यक राहील. संबंधित अभ्यासक्रमातील प्रवेश क्षमता ही उपलब्ध पीएच.डी. मार्गदर्शकांच्या संख्येनुसार निश्चित करण्यात येणार आहे.

महाविद्यालयांनी चौथे वर्ष सुरू करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मान्यताप्राप्त प्राध्यापक व शैक्षणिक गुणवत्ता निकष पूर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच 'ऑनर्स विथ रिसर्च' अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संबंधित विषयात पदव्युत्तर (PG) अभ्यासक्रम उपलब्ध असणे आवश्यक राहील.

Pune Main
Page No. 2 Apr 09, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार आता एकत्रित मार्कशीट!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने प्रथमच दहावी व बारावी परीक्षेचे गुणपत्रक (मार्कशीट) आणि प्रमाणपत्र (सर्टिफिकेट) एकत्रित स्वरूपात देण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी गुणपत्रक आणि प्रमाणपत्र वेगवेगळे दिले जाते. आता ही दोन्ही कागदपत्रे एकत्रित स्वरूपात दिली जाणार असल्याने विद्यार्थ्यांना दोन-दोन कागदपत्रे सांभाळण्याची गरज भासणार नाही. तसेच प्रवेशप्रक्रियेवेळी कागदपत्रांची पडताळणी करणे अधिक सोपे आणि सुटसुटीत होणार आहे.

### प्रतीक्षा संपणार

आजवर निकाल जाहीर झाला की, फक्त गुणपत्रिका विद्यार्थ्यांच्या हातात पडत. सनद म्हणजे बोर्ड प्रमाणपत्र मिळण्यासाठी काही महिने जात. कारण विद्यार्थी व संस्थांना गुण पडताळणी करण्यास उशीर लागायचा. आता दोन्ही प्रमाणपत्र एकाच वेळी हाती पडणार आहेत.

### फोटो व क्यूआर कोड

गुणपत्रिका व प्रमाणपत्र या एकत्रित प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांचा फोटो, क्यूआर कोड असेल. ज्यामुळे ओळख व सत्यता अचूक पडताळणे शक्य होईल. क्यूआर कोड दिल्यामुळे कागदपत्रांची लवकर तपासणी करणे शक्य होईल.

### छायाचित्र, नावातील त्रुटीही सुधारण्याची संधी

विशेष म्हणजे राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर फोटो करेक्शन पर्याय दिलेला आहे. छायाचित्र किंवा नावातील त्रुटी असल्यास सदर पर्याय स्वीकारून दुरुस्ती करण्याची संधीही विद्यार्थ्यांना मिळणार आहे.



> "गुणपत्रक आणि प्रमाणपत्र एकत्रित दिल्याने फसवणूक टळणार आहे. त्याचबरोबर प्रवेशप्रक्रियेत कागदपत्र पडताळणी जलद आणि सुलभ होईल. कागदपत्र गहाळ होण्याचा धोका कमी होईल. क्यूआर कोडमुळे ऑनलाइन सत्यापन सोपे होणार आहे. सरकारी व खासगी नोकरी अर्ज करताना प्रक्रिया गतिमान होण्याबरोबर डिजिटल कॉपी जतन करण्यासह शेअर करणे सोयीचे होईल. या बदलामुळे विद्यार्थ्यांची कागदपत्रे अधिक सुरक्षित, सुलभ आणि विश्वासार्ह होतील.
>
> **दीपक माळी,** सचिव, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ

### विद्यार्थ्यांच्या नावाच्या क्रमात बदल

विद्यार्थ्यांच्या नावाच्या क्रमातही आधार कार्डवरील नावाप्रमाणे बदल करण्यात येणार आहे. माहिती अधिक स्पष्ट पद्धतीने सादर केली जाणार आहे. यामुळे बनावट कागदपत्रांना आळा बसेल.

### दोन कागदपत्रे सांभाळण्याचा ताण मिटला

दोन्ही प्रमाणपत्र एकाच वेळी मिळणार असल्याने दोन दोन कागदपत्र सांभाळण्याचा ताण कमी होईल, तसेच विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार आहे. शिवाय प्रक्रिया सुलभ होणार आहे.

Hello Pune
Page No. 8 Apr 10, 2026
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

# Four-year degree: Autonomous colleges seek clarity

**Soham Shah**
*Pune, April 9*

EVEN AS the Maharashtra Higher and Technical Education Department released guidelines for implementation of the four-year undergraduate programme in the state this week, autonomous colleges say several important aspects still remain unclear. Autonomous colleges will begin offering the four-year programme from Academic Year 2026-27 onwards, a year earlier than affiliated colleges.

As the guidelines were relsaed late, autonomous colleges have not been able to counsel students on the pros and cons of opting for the four-year UG programme. The guidelines were expected to provide clarity to both colleges and students; however, important questions—regarding grant-in-aid, scholarships, and class sizes—still remain unanswered. The Indian Express spoke to heads of autonomous colleges affiliated to the Savitribai Phule Pune University (SPPU) to understand their concerns.

Professor Sanjay Kharat, principal, Modern College of Arts, Science and Commerce, told The Indian Express, "There are two issues that are not clear. The first is whether the four-year programme will be a grant-in-aid programme. The second issue is whether the students who take admissions in fourth year are eligible for getting scholarship from the social welfare department or any other scholarship that is given through the MahaDBT portal."

He added, "Students who have completed three years of UG programme are eligible for getting an admission into a two-year masters programme. If, unfortunately, the fourth year is kept as non-grant, then the fee structure will increase almost two to three times as compared to a granted course. The student will then prefer to go for the regular masters course instead of paying a huge fee for the fourth year."

According to internal surveys at his college, Kharat says 20-25 per cent of students are interested in opting for the four-year programme.

Professor Avinash Moharail, principal of Sir Parashurambhau College (SP) College, opined that due to the guidelines declaring that the fourth year will not be considered 'natural growth', the year will not be grant-in-aid. "So our first problem is how much will the fee be for that particular course? Because if the course is a grant-in-aid course, then students pay approximately Rs 6,000-10,000 as fee. But if it goes to the non-grant section, then that fee rises to Rs 40,000," he said.

"Secondly, if we want to get scholarship benefits for that course, then that fee is to be fixed by fee fixation committee of the university. And then we will go for mapping of that fee with the social welfare department so that students will be able to fill the forms of scholarship as they do for first year, second year, third year. So that is to be decided," he added.

According to the guidelines, the UG Honours with Research degree will only be approved at colleges with a dedicated PhD research centre. Five students per PhD guide have been allowed for this course. On this, Prof Kharat said, "In the last 10-15 years, there has been no recruitment. Research guides have either retired or superannuated, hardly one or two are left. With 10 students we cannot run the programme because the other fees and salary to be given to the teacher cannot be covered. The fee will increase three to four times."

The Indian Express 10.4.2026

# अकरावीसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया आजपासून

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** शैक्षणिक सत्र २०२६-२७ मधील इयत्ता ११ वीसाठीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार असून त्यात विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग-१ भरून नोंदणी करता येणार आहे. प्रवेश अर्जाचा भाग-२ भरण्याची सुविधा दहावी परीक्षांचा निकाल जाहीर झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'इज ऑफ लिव्हिंग' या कार्यक्रमांतर्गत इयत्ता ११ वीसाठी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय गतवर्षी घेतला. त्यानुसार २०२५-२६ मध्ये राज्यातील उच्च माध्यमिक विद्यालयांत इयत्ता ११ वीचे प्रवेश नवीन प्रणालीद्वारे करण्यात आले. अनेक अडचणींचा सामना करत त्यावेळी अकरावी प्रवेश प्रक्रिया पार पडली होती. यंदा अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी राज्य मंडळाने तयारी सुरू केली आहे. त्यानुसार दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेश प्रक्रियेतील अर्जाचा भाग १ भरण्याची सुविधा सुरू केली आहे. त्यानुसार १० एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून विद्यार्थ्यांना https://mahafvicadmissions.in या संकेतस्थळावर ही सुविधा उपलब्ध होणार आहे.

## अर्जाचा भाग-१ भरण्याची विद्यार्थ्यांना सुविधा

### अडचणींबाबत संपर्क साधण्याचे आवाहन

ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी करताना विद्यार्थ्यांना काही तक्रार आल्यास त्यांनी support@mahafyjcadmissions.in या ई-मेलवर किंवा मदत क्रमांक ८५३०९५५५६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी केले आहे.

**मार्गदर्शन सूचना जाहीर**

प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी शिक्षण संचालनालयाकडून महत्त्वाच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्य मंडळाशी संलग्न सर्व उच्च माध्यमिक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारेच अर्ज करणे आवश्यक आहे. अन्य मंडळांतून इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना राज्य मंडळाच्या कनिष्ठ महाविद्यालयांत प्रवेश घ्यायचा असल्यास त्यांनाही ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज करणेच आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रिया ही गुणवत्तेनुसार आणि निर्धारित निकषांच्या आधारावरच राबविण्यात येणार असून, शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू राहील. ऑनलाईन प्रणालीशिवाय अन्य कोणत्याही मार्गाने प्रवेश दिले जाणार नाही.

**प्रवेश प्रक्रियेबाबत संकेतस्थळावर माहिती**

अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. या संकेतस्थळावर राज्यातील इयत्ता ११ वीचे वर्ग असलेली महाविद्यालये, उपलब्ध शाखा, माध्यमांची माहिती, प्रवेश क्षमता व रिक्त जागा यांचा सविस्तर तपशील उपलब्ध केला जाणार आहे.

Loksatta 10.4.2026

## *News Paper Clippings During April 2026*

### *Section: Education*

प्रभात

# गुणवत्ता वाढीसाठी ज्ञानातून समृद्धी

**विशेष**

- चंद्रकांत पाटील
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

**शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून सामाजिक सक्षमीकरण आणि राष्ट्रनिर्मितीसाठीचे एक प्रभावी माध्यम आहे. महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०)ची प्रभावी अंमलबजावणी करणारे अग्रेसर राज्य आहे.**

महाराष्ट्राने उच्च शिक्षणात दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. तंत्रशिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाचा पाया आहे.

महाराष्ट्रातील तंत्रशिक्षण अधिक सक्षम, अद्ययावत आणि उद्योगक्षम होत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीसह, बहुविद्याशाखीय शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण, अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे आणि इंटरनेट ऑफ थिंग्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, डेटा सायन्स आणि रोबोटिक्ससारख्या अत्याधुनिक कालसुसंगत अभ्यासक्रमांचा समावेश केल्याने तंत्रशिक्षणाला नवसंजीवनी मिळाली आहे. या बदलांमुळे केवळ विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होत नाही, तर महाराष्ट्राचा औद्योगिक आणि आर्थिक विकासही अधिक वेगाने घडतो आहे. राज्य शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन महाराष्ट्राचा उच्च शिक्षणातील महत्त्वाकांक्षी विकास आराखडा तयार केला. तो इतर राज्यांसाठी एक आदर्श उदाहरण ठरू पाहत आहे. दृढ राजकीय इच्छाशक्ती, संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग आणि द्रष्टे नेतृत्व यामुळे भविष्यासाठी सज्ज अशी शिक्षण प्रणाली घडविण्याचे स्वप्न पाहात शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, लोकाभिमुख केली जात आहे.

### आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे कॅम्पस

परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस महाराष्ट्रात सुरू करण्यात येत आहेत. एज्युकेशन सिटी प्रकल्पाच्या अंतर्गत, नवी मुंबई परिसरात सर्वोच्च १० परदेशी विद्यापीठांचे कॅम्पस उभारण्याचे नियोजन आहे. ही देशातील पहिली अशा प्रकारची आंतरराष्ट्रीय एज्युकेशन सिटी ठरणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई व मुंबईला जागतिक शैक्षणिक केंद्र म्हणून ओळख मिळवून देईल तसेच भारतीय विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण देशातच उपलब्ध होईल. जागतिक दर्जाचे अभ्यासक्रम, संशोधन संधी आणि अनुभव आता परदेशी न जाता देशातच उपलब्ध होतील, हे शिक्षण केवळ परदेशी अभ्यासक्रमांची प्रतिकृती न राहता, भारतातील स्थानिक गरजांशी सुसंगत व रोजगारक्षम असेल. अभ्यासक्रम स्थानिक औद्योगिक गरजांनुसार अनुकूल केले जातील, संशोधन, स्टार्टअप्स आणि उद्योग सहकार्याला चालना मिळेल. विद्यार्थ्यांना एक्स्चेंज प्रोग्राम, सेमिस्टर ट्रान्सफर, ग्लोबल इंटर्नशिप्स यांसारख्या संधी उपलब्ध होतील आणि प्राध्यापक व संशोधक यांचाही आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभाग वाढेल आणि महाराष्ट्र राज्याचे एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट व भारताचे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे आर्थिक लक्ष्य २०२९पर्यंत साध्य करण्यासाठी हा एक महत्त्वाचा घटक ठरेल.

शैक्षणिक सुविधा लोकाभिमुख व्हाव्यात या उद्देशाने देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्रात सुरू करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत एक हजार MOOC माध्यमातून प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एनईपी-२०२०) अंतर्गत भारतीय ज्ञानप्रणाली जेनेरिक (IKS - Indian Knowledge System-Generic) हा अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार केला आहे. या पोर्टलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण ऑनलाइन शिक्षण सहज एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आले आहे.



### मुलींना मोफत उच्चशिक्षण

नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलीचे प्रमाण वाढावे आणि मुलींना संधी उपलब्ध होण्यासाठी आर्थिकदृष्ट्या मागास (ईबीसी), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्लूएस), सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (एसईबीसी) व इतर मागासवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील पात्र विद्यार्थिनींना महाविद्यालयीन शिक्षणासाठीचे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या संपूर्ण रकमेची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वार्षिक उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या पालकांच्या मुलीचे पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण मोफत देण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४च्या तुलनेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये जवळपास ५३ हजार ४४४ एवढी मुलीची संख्या वाढली आहे.

### एईडीपी अभ्यासक्रम

उच्च शिक्षण संस्थांमध्ये अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (एडीपी) अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. यामुळे अध्ययन आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण यांच्यामध्ये असलेली दरी कमी करून शिक्षण आणि उद्योग यांच्यात संवाद निर्माण करून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत, उद्योग क्षेत्राकरिता आवश्यक कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कौशल्य आधारित अभ्यासक्रम तयार केले गेले आहेत. अप्रेंटिसशिपमध्ये प्रत्यक्ष कामावर आधारित शिक्षण आणि सिद्धान्तिक ज्ञान यांचा समावेश असल्याने राज्यातील सर्व कृषी विद्यापीठे आणि पात्र ठरणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून लागू केले आहेत.

### सीईटी परीक्षेसाठी अटल उपक्रम

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून घेण्यात येणाऱ्या सीईटीसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्रथमच CET-ATAL (Assess-ment Test and Learning) Mock Test and Psychometric Test Module सुरू करण्यात आले आहे. या मॉड्युलचा फायदा उमेदवारांना त्यांच्या अभ्यासक्रमाच्या सामायिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचा सराव करण्यासाठी होत आहे. तसेच यामुळे विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सामायिक प्रवेश परीक्षा देतानाचा आत्मविश्वास वाढत आहे.

राज्यातील पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांसाठी यावर्षी विद्यार्थ्यांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी आतापर्यंत १ लाख ३ हजार ११५ विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे. मागील दहा वर्षांतील हा सर्वोच्च आकडा असून, प्रवेशाची टक्केवारी तब्बल ९३ टक्क्यांवर पोहोचली आहे. दहावीनंतरचे पदविका अभ्यासक्रम हे विद्यार्थ्यांसाठी रोजगार व उच्च शिक्षणाचा उत्तम पर्याय ठरत असून, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डाटा सायन्स, रोबोटिक्स यांसारखे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती मोहिमा, उद्योगक्षेत्राशी सामंजस्य करार आणि स्वयंअध्ययन मूल्यांकन यांसारख्या उपक्रमांमुळे विक्रमी प्रतिसाद मिळाला.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना ६० टक्के अनुदान वाढ तसेच दर्जा वाढ करण्यात आला आहे. केवळ एका क्लिकवर राज्यातील १२ हजार ग्रंथालयांना तत्काळ अनुदान मिळत आहे. भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत. महाराष्ट्रातही या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भक्कम पावले टाकली जात असून, शिक्षण क्षेत्राला ज्ञानाधिष्ठित, कौशल्याधारित आणि जागतिक स्पर्धेस सक्षम बनवण्याचा निर्धार केला आहे. वसुधैव कुटुंबकम् या तत्त्वज्ञानाचा हा शैक्षणिक आविष्कार असून, महाराष्ट्राची शैक्षणिक वाटचाल केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून नव्या भारताच्या ज्ञानाधिष्ठित विकासाची दिशा दर्शवणारी आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मी माझे योगदान देत आहे, विद्यार्थ्यांनो, तुम्हीच देशाचे आणि महाराष्ट्राचे भविष्य आहात. कठोर परिश्रमांच्या माध्यमातून ज्ञान अर्जित करा आणि एक सशक्त व समृद्ध महाराष्ट्र घडवण्यासाठी सज्ज व्हा.

Pune City Edition
Apr 15, 2026 Page No. 4
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

**पुढारी**

## अंगणवाड्यांची जबाबदारी आता उच्च शिक्षण संस्थांवर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत पूर्वप्राथमिक शिक्षणाला चालना देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठे, महाविद्यालयांना प्रत्येकी ५ ते ६ अंगणवाडी केंद्रे दत्तक घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. यूजीसीचे सचिव प्रा. मनीष जोशी यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

अंगणवाडी केंद्रे ही देशातील ग्रामीण आणि शहरी भागातील बालकांच्या पोषण, आरोग्य आणि प्राथमिक शिक्षणासाठी महत्त्वाची यंत्रणा मानली जाते. १९७५ पासून एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रे कार्यरत आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०अंतर्गत पूर्वप्राथमिक शिक्षणाचा समावेश औपचारिक शिक्षणात केला आहे. त्यामुळे पूर्वप्राथमिक शिक्षणाचे महत्त्व वाढणार आहे.

या पार्श्वभूमीवर, केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाने अंगणवाडी केंद्रांच्या गुणवत्तावाढीसाठी उच्च शिक्षण संस्थांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन देण्याची योजना आखली आहे. या माध्यमातून बालकांसाठी अधिक

- **विद्यापीठे, महाविद्यालयांना प्रत्येकी ५ ते ६ अंगणवाडी केंद्रे दत्तक घेण्याच्या सूचना**

व्यावसायिक आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचा उद्देश आहे. त्यानुसार मंत्रालयाचे सचिव अनिल मलिक यांनी विद्यापीठे, महाविद्यालयांना अंगणवाड्यांशी जोडण्याच्या, प्रत्येकी पाच ते सहा अंगणवाड्या दत्तक घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

प्रामुख्याने समाजकार्य, गृहशास्त्र, पोषणशास्त्र, मानसशास्त्र आणि सार्वजनिक आरोग्य या शाखांमधील विद्यार्थ्यांना कार्यप्रशिक्षण (इंटर्नशिप), क्षेत्र अभ्यास (फील्ड वर्क), संशोधन प्रकल्पांद्वारे अंगणवाडी केंद्रांशी संलग्न करावे, असे स्पष्ट केले आहे. अंगणवाड्यांशी संबंधित काम शैक्षणिक क्षेत्रभेट, संशोधन प्रबंध, कार्यप्रशिक्षणाशी जोडण्या बाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Apr 16, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com

---

**नवराष्ट्र**

Pune | 16 April 2026 | Page 1

## 'अकृषिक विद्यापीठे' ऐवजी आता 'सार्वजनिक विद्यापीठे'

### राज्य शासनाकडून पत्रकाद्वारे आदेश

▶ **पुणे, शहर प्रतिनिधी** उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विद्यापीठांना यापुढे 'अकृषिक विद्यापीठे' असा उल्लेख न करता 'राज्य सार्वजनिक विद्यापीठे' असा शब्दप्रयोग करण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाने परिपत्रकाद्वारे दिले आहेत. या निर्णयामुळे विद्यापीठांच्या वर्गीकरणात स्पष्टता आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १५ एप्रिल २०२६ रोजी काढलेल्या महाराष्ट्र शासन उप सचिव प्रताप लुबाळ यांनी परिपत्रकानुसार, पारंपरिक विद्यापीठांना 'अकृषि विद्यापीठे' असे संबोधण्याची पद्धत प्रचलित होती. मात्र राज्यात कृषि, वैद्यकीय शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता अशा विविध विभागांच्या नियंत्रणाखालीही विद्यापीठे कार्यरत असल्याने 'अकृषि' हा शब्दप्रयोग दिशाभूल करणारा ठरत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ हा १ मार्च २०१७ पासून लागू असून त्याअंतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील ११ विद्यापीठे कार्यरत आहेत. या सर्व विद्यापीठांना 'राज्य सार्वजनिक विद्यापीठे' असे संबोधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### शब्दप्रयोग टाळण्याच्या सूचना

या विभागाच्या नियंत्रणाखाली विशिष्ट उद्देशांसाठी स्थापन केलेली किंवा स्वतंत्र अधिनियमांतर्गत कार्यरत असलेली इतर सार्वजनिक विद्यापीठेही अस्तित्वात असून, त्यांचा तपशील प्रपत्र-ब मध्ये देण्यात आला आहे. या पुढे संचालक यांनी सर्व संबंधित संस्थांना याबाबत कळवून पुढील सर्व शासकीय पत्रव्यवहारात 'अकृषि विद्यापीठे' हा शब्दप्रयोग टाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याऐवजी 'राज्य सार्वजनिक विद्यापीठे' हा शब्दप्रयोग वापरणे आवश्यक करण्यात आले आहे.

epaper.navarashtra.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

# शिक्षण संस्थांना परदेशी विद्यापीठांशी थेट संपर्कावर निर्बंध

देवेश गोंडाणे, लोकसत्ता

## परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची परवानगी बंधनकारक

**नागपूर :** राज्यातील शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांना परदेशी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व कार्यालयासोबत बैठक, विचारविनिमय किंवा संपर्क करण्यापूर्वी आता केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची परवानगी घेणे आवश्यक करण्यात आले आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी सर्व विद्यापीठे आणि उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाला तशा सूचना दिल्या आहेत. यामुळे विविध विद्यापीठांमधील उच्चपदस्थ व्यक्तींच्या या अनुषंगाने होणाऱ्या परदेश दौऱ्यांवर चाप बसण्याची शक्यता आहे.

> राज्य शासनातील विभाग, अधीनस्त कार्यालये, अधिकारी यांच्यामार्फत विदेश मंत्रालयाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अन्य देशातील सरकार, संस्था, पदाधिकारी यांच्याशी संपर्क केला जात असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालय तसेच गृह मंत्रालयाने निदर्शनास आणून दिले आहे. यासाठी केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.
> **- राजेश अग्रवाल**, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

### आंतरराष्ट्रीय परिषदांच्या नावाने गैरप्रकार!

परदेश दौरा करण्यासाठी प्राध्यापक मंडळी आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करतात. यासाठी पाच प्राध्यापकाकडून पैसे गोळा करणाऱ्या एका प्राध्यापकाला मोफत प्रवास दिला जातो. यावर कुणाचाही वचक नसल्याने काही प्राध्यापकांनी मध्यस्थी करून आंतरराष्ट्रीय परिषदांच्या नावावर व्यवसाय सुरू केल्याच्याही तक्रारी समोर आल्या आहेत.

परदेशी विद्यापीठांचा अभ्यासक्रम राज्यातील विद्यापीठांमध्ये सुरू केला जातो. हे अभ्यासक्रम काही वर्षात बंदही होतात. मात्र, त्यासाठी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना परदेशात जाण्याची संधी मिळते. यात विद्यापीठांचे पैसे खर्च होतात. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी विद्वत परिषद सदस्य प्रा. डॉ. संजय खडक्कार यांनी अशा प्रकाराबाबत मुख्यमंत्री आणि विद्यापीठ अनुदान आयोगाला माहिती दिली होती. यात विद्यापीठाचे कुलगुरू व प्रा. जयदीप निकम यांच्या झांबिया देशाच्या दौऱ्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. याची राज्याच्या मुख्य सचिवांनी तात्काळ दखल घेतली.

Loksatta 16.4.2026

प्रभात

# सर्व प्राचार्यांसह प्राध्यापकांना एनईपी प्रशिक्षण अनिवार्य

**महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय**

**मुंबई, दि. १७-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची २०२० प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक आणि प्राध्यापकांसाठी विशेष प्रशिक्षण आता अनिवार्य करण्यात आले आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी या निर्णयाची घोषणा केली.

राज्यात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून नवीन चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम सुरू होत आहेत. या पार्श्वभूमीवर, मे महिन्याच्या मध्यापासून हे ऑनलाइन प्रशिक्षण टप्प्याटप्प्याने सुरू होईल. महाराष्ट्र राज्य विद्याशाखा विकास प्रबोधनी द्वारे लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिम विकसित केली जात असून, त्याद्वारे हे स्वयंचलित प्रशिक्षण दिले जाईल. यामध्ये अनुदानित आणि विनाअनुदानित अशा दोन्ही प्रकारच्या महाविद्यालयांचा समावेश असेल.

नवीन शैक्षणिक आराखड्यात चार वर्षांची पदवी, ऑनर विथ रिसर्च, क्रेडिट सिस्टम आणि बहु-प्रवेश व निर्गमन यांसारखे आमूलाग्र बदल होणार आहेत. हे बदल संपूर्ण राज्यात एकसमान पद्धतीने राबवले जावेत आणि अंमलबजावणीदरम्यान कोणतीही प्रशासकीय किंवा शैक्षणिक अडचण येऊ नये, या उद्देशाने हे प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे.

उच्च शिक्षण अधिक लवचिक आणि संशोधनभिमुख बनवण्यासाठी शिक्षक आणि प्रशासकांना या नवीन रचनेचे स्पष्ट आकलन असणे आवश्यक असल्याचे मंत्री पाटील यांनी यावेळी नमूद केले. जून महिन्यापर्यंत हे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

Pune City Edition
Apr 18, 2026 Page No. 10
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

**प्रभात**

# इतर शुल्क माफीबाबत सरकारकडून चाचपणी

## मुलींना उच्च शिक्षण पूर्णपणे मोफत देण्याचे चंद्रकांत पाटील यांचे संकेत

**भात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २०** - राज्यातील मुलींच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकारने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आणखी एक मोठे पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थिनींना सध्या मिळणाऱ्या शिक्षण आणि परीक्षा शुल्क माफीसोबतच, आता महाविद्यालयांकडून आकारले जाणारे इतर शुल्कदेखील १०० टक्के माफ करण्याबाबत सरकार सकारात्मक विचार करत असल्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी येथे केली.

पुणे विद्यापीठातील एका कार्यक्रमादरम्यान प्रसारमाध्यमांशी बोलताना पाटील यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, की महाविद्यालयांकडून आकारल्या जाणाऱ्या अव्वाच्या सवा शुल्कावर चाप लावण्यासाठी हे शुल्क आता शुल्क नियामक प्राधिकरणाच्या (एफआरए) कक्षेत आणण्याबाबत चर्चा सुरू आहे. यामुळे शुल्कावर नियंत्रण येईलच; पण त्यासोबतच मुलींना हे शुल्क भरावे लागू नये, यासाठी चाचपणी सुरू असून, लवकरच यावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

विद्यार्थिनींना केवळ शुल्कात सवलत देऊन न थांबता, त्यांच्या दैनंदिन खर्चासाठीही सरकार मदतीचा हात पुढे करत आहे. कमवा व शिका योजनेच्या धर्तीवर सीएसआर निधीच्या माध्यमातून मुलींना दरमहा किमान दोन हजार रुपये मानधन देण्याचा मानस पाटील यांनी व्यक्त केला. हा उपक्रम सध्या प्रायोगिक तत्त्वावर सुरू असून, तो राज्यभर राबवण्यासाठी विविध कंपन्यांशी बोलणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### शुल्कावर विद्यापीठांचा अंकुश

बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमध्येही इतर शुल्काच्या नावाखाली मोठी वसुली केली जात असल्याच्या तक्रारींवर पाटील यांनी नाराजी व्यक्त केली. विद्यापीठांनी आपल्या संलग्न महाविद्यालयांच्या शुल्कावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मनमानी शुल्क आकारणाऱ्या संस्थांची नावे कळवा, त्यांच्यावर तातडीने कारवाई केली जाईल, असा इशाराही पाटील यांनी या वेळी दिला.

Pune City Edition
Apr 21, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com

**पुढारी**

# विद्यापीठाच्या 'कमवा व शिका' योजनेचे मानधन वाढले

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमध्ये व संलग्न महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आणि 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय विद्यापीठातर्फे घेण्यात आला आहे. त्यामुळे वाढत्या महागाईच्या काळात शिक्षणासाठी पुण्यात आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. विद्यापीठाने प्रत्येक तासासाठी ५५ रुपयांवरून ६५ रुपयांपर्यंत मानधानात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

> विद्यार्थ्यांना आता प्रत्येक तासासाठी ५५ ऐवजी ६५ रुपये मानधन

विद्यापीठात व विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःचा आर्थिक खर्च स्वतःच भागवता यावा, या उद्देशाने 'कमवा व शिका' योजना राबविली जाते. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षण संस्थेतच प्रशासकीय व इतर अशैक्षणिक कामे दिली जातात. त्यासाठी विद्यार्थ्यांना ५५ रुपये तास एवढे मानधन दिले जाते. परंतु, या मानधनात वाढ करावी, अशी मागणी विविध विद्यार्थी संघटनांकडून करण्यात आली होती.

विद्यापीठाच्या अधिसभेच्या दिवशी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलन करून विद्यापीठ प्रशासनाला मानधनात वाढ करण्याचे निवेदन दिले होते. त्यावर विद्यापीठातर्फे सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. मानधनवाढीबाबत विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. देविदास वायदंडे यांची समिती स्थापन केली होती. या समितीने प्रतितास १० रुपये एवढे मानधन वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एका दिवसात ३ तास काम करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला दररोज ३० रुपये अधिकचे मानधन मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी एका तासाला प्रत्येकी रु. ८० मानधनवाढ मिळावी, अशी मागणी केली होती.

Pune Edition
Apr 25, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

**प्रभात**

# एमएचटी-सीईटी गुणांवर बीबीए, बीएमएस प्रवेश

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे,** दि. २४ - एमएचटी-सीईटीचे गुण आता बीबीए, बीसीए, बीएमएस या अभ्यासक्रमांसाठी ग्राह्य धरले जाणार असल्याचे संकेत उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिले. ज्या विद्यार्थ्यांना पीसीएम किंवा पीसीबी गटात गुण मिळवूनही तांत्रिक कारणास्तव प्रवेश मिळाला नाही, त्यांना आता या व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे वळता येणार आहे. यामुळे राज्यातील महाविद्यालयांमधील रिक्त जागांचा प्रश्नही मार्गी लागणार आहे. या निर्णयाचे लवकरच जीआर निघण्याची चिन्हे आहेत.

अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी या पदवी अभ्यासक्रमांसाठी एमएचटी-सीईटी अनिवार्य आहे. गेल्या वर्षापासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने बीबीए, बीसीए आणि बीएमएस अभ्यासक्रमांना आपल्या कक्षेत घेतल्याने त्यांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे राबवण्यात येत आहे. मात्र, माहितीचा अभाव आणि दोनवेळा प्रवेश परीक्षा घेऊनही गेल्यावर्षी राज्यातील तब्बल ३० टक्क जागा रिक्त राहिल्या होत्या. यंदाही एक लाखांहून अधिक जागा उपलब्ध असताना केवळ ७० हजार अर्ज आल्याने महाविद्यालयांसमोर चिंतेचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि महाविद्यालयांमधील जागा भरण्यासाठी शासनाने हे पाऊल उचलले आहे.

प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्यासाठी प्रथम प्राधान्य हे या विशेष अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्र सीईटी दिलेल्या विद्यार्थ्यांनाच दिले जाईल. त्यानंतरच्या रिक्त जागांवर एमएचटी-सीईटी दिलेल्या विद्यार्थ्यांचा विचार केला जाईल. या निर्णयामुळे ज्यांना अभियांत्रिकी किंवा औषधनिर्माणशास्त्रामध्ये आवडीचे महाविद्यालय मिळाले नाही, त्यांच्यासमोर आता बीबीए किंवा बीसीए सारखे उत्तम व्यावसायिक पर्याय खुले असतील, अशी माहिती विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

Pune City Edition
Apr 25, 2026 Page No. 13
Powered by: erelego.com

**लोकमत**

# अकरावी प्रवेशात यंदापासून मुलींसाठी असणार स्वतंत्र फेरी

## १५ जुलैपासून ११वीचे वर्ग; संपूर्ण राज्यात ऑनलाइन प्रवेश वेळापत्रक जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** यंदापासून राज्यातील सर्व अकरावी प्रवेश ऑनलाइन व गुणवत्तेनुसार होणार असून, मुलींसाठी स्वतंत्र विशेष फेरीची तरतूद करण्यात आली आहे. १५ जुलैपासून ११वीचे वर्ग सुरू होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय सोमवारी जारी केला आहे.

नवीन प्रक्रियेनुसार, ३ नियमित फेऱ्या घेण्यात येणार आहेत. त्यानंतर सर्वांसाठी खुली फेरी होईल आणि त्यापुढे केवळ



मुलींसाठी विशेष पाचवी फेरी आयोजित केली जाईल. गुणवत्ता निश्चित करताना राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या सर्वोच्च पाच विषयांचे गुण विचारात घेतले जाणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यास एकाच अर्जाद्वारे राज्यातील कोणत्याही शाळेची निवड करता येईल. अल्पसंख्याक कोटा ५० टक्के, व्यवस्थापन कोटा ५ टक्के आणि इन-हाऊस कोटा १० टक्के निश्चित करण्यात आला आहे.

## तीन फेऱ्यांनंतर मुलींसाठी विशेष फेरी

शून्य फेरीत व्यवस्थापन, अल्पसंख्याक व इन-हाऊस कोट्यातील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर पहिली, दुसरी व तिसरी फेरीचे वेळापत्रक संचालनालयाकडून जाहीर केले जाईल. तीन नियमित फेऱ्यांनंतर मुलींसाठी विशेष फेरी आणि त्यानंतर सर्वांसाठी खुली फेरी आयोजित केली जाईल. उच्च माध्यमिक वर्ग १५ जुलै किंवा त्यापूर्वी सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## असा आहे कार्यक्रम

**शाळा व महाविद्यालयांची माहिती संकेतस्थळावर भरणे :** १० एप्रिल ते २५ एप्रिल

माहितीचे प्रमाणीकरण (विभागीय शिक्षण उपसंचालकांकडून) : २६ एप्रिल ते ५ मे

**विद्यार्थ्यांचे ऑनलाइन प्रोफाइल तयार करणे : ५ मे ते १४ मे**

प्राधान्यक्रम भरणे : दहावी निकालानंतर दिनांक जाहीर

**अकरावीचे वर्ग सुरू : १५ जुलैपासून**

Pune Main
Page No. 5 Apr 29, 2026
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

**नवराष्ट्र**

Pune | 30 April 2026 | Page 6

# चौथ्या वर्षाला स्वतंत्र ओळख हवी

## राष्ट्रीय शिक्षण धोरण : माजी कुलगुरू प्रा. नितीन करमळकर

▶ **पुणे, शहर प्रतिनिधी**

पदवीच्या चौथ्या वर्षाला स्वतंत्र शैक्षणिक ओळख असावी असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. नितीन करमळकर यांनी केले. त्यांनी संशोधन पद्धती, विषयविशेष अभ्यास आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संशोधन यावर भर दिला, तसेच उद्योग-शैक्षणिक सहकार्य आणि 'व्यावहारिक प्राध्यापक' संकल्पना आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स (जीआयपीई) आणि शिक्षण सेतू यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) अंतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या चौथ्या वर्षाच्या अंमलबजावणीवर एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी शिक्षण सेतूचे संस्थापक व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य कृष्णा भंडलकर, प्राचार्य डॉ.



अनिल राव आदी मान्यवर उपस्तीत होते.

डॉ. अनिल राव यांनी लवचिक आणि एनईपी-सुसंगत शैक्षणिक आराखड्याची गरज व्यक्त केली. त्यांनी कामाचा समतोल, नियामक सुलभता आणि प्रशासकीय सुलभता यावर भर देत एआयएसएचई आकडेवारीच्या आधारे पदव्युत्तर शिक्षणाबाबत जागरूकतेचा अभाव आणि उर्ध्वगामी प्रगतीतील मर्यादा याकडे लक्ष वेधले. महासारक कडून मिळालेल्या सूचनांनुसार संरचित परंतु लवचिक शैक्षणिक आराखडा विकसित करण्यावर भर देण्यात आला, ज्यामध्ये क्रेडिट प्रणाली, प्रगतीचे मार्ग आणि उर्ध्वगामी प्रगती स्पष्ट करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

कार्यशाळेच्या समारोपात कृष्णा भंडलकर यांनी, ज्यामध्ये एनईपी अनुषंगाने विद्यार्थी-केंद्रित, लवचिक आणि उद्योग-संलग्न शिक्षण प्रणालीची गरज अधोरेखित केली. त्यांनी प्रास्ताविकात एनईपी अंतर्गत पदवी शिक्षणाच्या बदलत्या संरचनेचा आढावा मांडला.

### चौथे वर्ष विद्यार्थ्यांसाठी 'फिनिशिंग स्टेज'

कार्यशाळेच्या सत्रामध्ये समतोल अभ्यासभार, बहुपर्यायी प्रवेश-निर्गम, उद्योगाशी संलग्नता आणि रोजगाराभिमुख शिक्षण यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. चौथे वर्ष विद्यार्थ्यांसाठी 'फिनिशिंग स्टेज' म्हणून विकसित करण्याचा विचार मांडण्यात आला.

epaper.navarashtra.com

# *News Paper Clippings During April 2026*

## *Section: Education*

# Unaided colleges to become pvt varsities

SwatiShindeGole
@timesofindia.com

**Pune:** The Maharashtra higher and technical education department has constituted an expert committee to prepare a comprehensive policy facilitating conversion of unaided govt colleges into private universities for greater autonomy and momentum. The report is to be submitted within two months.

Minister of higher education Chandrakant Patil said on Wednesday that former vice-chairman of the University Grants Commission Bhushan Patwardhan will chair the committee. It will examine the eligibility criteria for conversion, academic performance of colleges, infrastructure requirements and quality of research.

The deputy secretary of the higher and technical education department, university education, and the state director of higher education will be members of the committee. The joint director, higher education, Pune division, will be the coordinator and member secretary.

Patil's statement said: "The committee will also study the policy to be followed regarding salary and non-salary grants provided by the govt after conversion as also matters related to the employees' provident fund."

The committee will further examine the feasibility of multidisciplinary institutions in line with the National Education Policy and clarify the policy regarding land allotted by the govt.

### Degree certificates to be uploaded on DigiLocker before convocation

Higher and technical education minister Chandrakant Patil has directed that after declaration of results and completion of due verification, degree certificates be uploaded on the DigiLocker immediately. The students should not be made to wait until the convocation ceremony.

The Times of India 30.4.2026

# State panel to form policy on conversion of aided colleges to private universities

Express News Service
*Pune, April 29*

THE MAHARASHTRA government has constituted a four-member committee to formulate a policy regarding conversion of non-government aided colleges into private universities. Through a government resolution (GR) released on April 28, the Higher and Technical Education Department has said that educational institutions had requested for such a policy to provide them with greater independence.

The committee will be led by Bhushan Patwardhan, former vice chairman of the University Grants Commission. Deputy Secretary (University Education), Higher and Technical Education Ministry, Director of Higher Education, and Joint Director of Higher Education, Pune Division, are the other three members of the committee. It will form a policy considering the educational, financial, technical, and administrative aspects of such a change. The committee has been given a timeline of two months to submit its report to the government.

### *Committee's responsibilities*

The committee is tasked with the following:

- To lay out the minimum required educational standards, infrastructure facilities, and research level for a non-government aided college to be converted into a private university.
- If the government has made land available to the aided college, a policy regarding the same needs to be formed as well.
- Once the aided college is converted into a private university, a policy regarding the salary, non-salary grant, and provident fund being given by the government is also to be formed.
- A policy regarding the consent of the teaching and non-teaching staff should also be formed. Further, the committee should recommend how the rights, terms of employance, and seniority of these employees will be protected.
- To recommend guiding principles so that reservations for backward classes and control of fees for common students is maintained even after conversion to private university.
- To study how such a transformation would help in formation of multidisciplinary universities in accordance with the National Education Policy (NEP) 2020.


NEP 2020 calls for 'granting graded autonomy to colleges' through a transparent system. It says, "All colleges currently affiliated to a university shall attain the required benchmarks over time to secure the prescribed accreditation benchmarks and eventually become autonomous degree-granting colleges."

The Indian Express 30.4.2026

# *Upcoming Events*

## *May 2026*

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 ***Chhatrapati Sambhaji Maharaj Jayanti***  | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 ***Anti Terrorism Day*** | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 ***Swatantryaveer Savarkar Jayanti***  | 29 | 30 | 31 ***Ahilyadevi Holkar Jayanti***  |




***Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com***